७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## मुंबई शहर प्लास्टिकमुक्त करणार : उपमहापौर संजय घाडी

मुंबई (दै. संध्या) : मुंबई शहरामध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्यास प्लास्टिकचा बेसुमार वापर कारणीभूत आहे . पर्यावरणाची हानी करण्यात प्रमुख घटक ठरलेल्या प्लास्टिकवर राज्य सरकारने मागील मार्च २०१८ पासून बंदी लागू केली. मुंबईतील बहुतांश भागात प्लास्टिकबंदी परिणामकारक ठरली आहे. मात्र ही बंदी १०० टक्के अंमलात आली नसल्याने ठिकठिकाणी जाणवते. छुप्या पध्दतीने काही प्रमाणात प्लास्टिकचा वापर अजूनही सुरुच आहे. प्लास्टिक बंदीची परिणामकारकता वाढवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने त्यातील त्रुटी शोधून दंडात्मक कारवाईची तीव्रता वाढविण्याची गरज असल्याचे सांगत नवनिर्वाचित उपमहापौर संजय घाडी यांनी मुंबई शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी कठोर पावले उचलली जावीत असेही पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केले. मुंबई महापालिकेत उपमहापौर पदी निवड झाल्यानंतर संजय घाडी यांनी महापालिका सभागृहात भाषण करताना तसेच बृहन्मुंबई महानगर पालिका पत्रकार संघाच्यावतीने आयोजित सत्कारानंतर पत्रकारांशी बोलतांना त्यांनी प्लास्टिक मुक्तीचा निर्धार व्यक्त केला.

### ढिंग-टांग




# मुंबईच्या महापौरपदी रितू तावडे

## उपमहापौरपदी शिवसेनेचे संजय घाडी विराजमान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात उपस्थित

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई महानगरपालिकेच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच पालिकेची सत्ता हस्तगत केल्यानंतर बुधवारी भाजपचा महापौर विराजमान झाला. भाजपच्या रितू तावडे यांची बुधवारी अधिकृतरित्या महापौर म्हणून निवड झाली. त्यामुळे आज मुंबई महानगरपालिकेतील प्रशासक राजवट संपुष्टात येऊन सत्ता लोकप्रतिनिधींच्या हातात आली. मात्र, सत्तारोहणाच्या या पहिल्याच दिवशी भाजप आणि ठाकरे गटाच्या नगरसेवकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. भाजपच्या नगरसेवकांनी हुतात्मा चौक येथे जाऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आणि त्यानंतर महायुतीचे सर्व नगरसेवक मुंबईत महानगरपालिकेत



आले. पालिका सभागृहात महायुतीचे नगरसेवक आल्यानंतर जोरदार शंखनाद करण्यात आला. भाजपच्या महापौरांच्या सत्तारोहणाच्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यामुळे भाजपच्या नगरसेवकांच्या अंगात प्रचंड उत्साह संचारला होता.

यावेळी भाजपच्या नगरसेवकांनी जय श्रीराम आणि मोदी-मोदीच्या घोषणा देऊन पालिका सभागृह डोक्यावर घेतले. भाजपच्या नगरसेवकांकडून मोदी-मोदीचा जयघोष थांबतच नव्हता. तेव्हा समोर उभ्या असलेल्या ठाकरे गटाच्या नगरसेवकांनी भाजपच्या 'मोदी-मोदी' पाठोपाठ अचानक 'चोर है, चोर है', अशा घोषणा सुरु केल्या. ठाकरे गटाच्या या अनपेक्षित पवित्र्यामुळे भाजप नगरसेवकांनी 'मोदी-मोदी'च्या घोषणा थांबवल्या. मात्र, लगेचच भाजपच्या नगरसेवकांनी 'देवाभाऊ-देवाभाऊ' नावाचा गजर सुरु केला. त्यावर कोणीही 'चोर है, चोर है' घोषणा देण्याची हिंमत दाखवली नाही. मात्र, ठाकरे गटाच्या नगरसेवकांनीही 'ठाकरे-ठाकरे' नावाचा जयघोष सुरु केला. या घोषणांमुळे पालिकेचे सभागृह दणाणून गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित साटम सभागृहाच्या गॅलरीत बसून हा प्रकार शांतपणे पाहत होते. पहिल्याच दिवशी ठाकरे गट आणि भाजप आमनेसामने आल्याने आगामी काळातही या दोन पक्षांमध्ये अशाचप्रकारची खडाजंगी होण्याची चिन्हं दिसत आहेत.

भाजपच्या रितू तावडे या महापौर आणि शिवसेनेचे संजय घाडी हे उपमहापौर म्हणून शपथ घेतली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील यावेळी सभागृहात उपस्थित होते.

महापौरपदी रितू तावडे आणि उपमहापौरपदी संजय घाडी असे महायुतीचे दोन शिलेदार विराजमान झाले आहे. मुंबई महानगरपालिकेला लोकाभिमुख आणि पारदर्शी प्रशासन देण्याबाबत आम्ही लोकांना मतं मागितली होती. मुंबईच्या जनतेने जो प्रतिसाद दिला होता, त्याला अनुरूप आज पदारोहण होत आहे. मी रितू तावडे यांचं अभिनंदन करतो. एक अनुभवी आणि अस्सल मराठी चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी मागच्या काळातही मुंबईकरांच्या प्रश्नाकरता आक्रमक भूमिका घेतली आहे.

यापुढेही त्यांच्या माध्यमातून मुंबईच्या विकासाचा कार्यक्रम महायुतीच्या सरकारने सुरु केला आहे तो महानगरपालिकेच्या माध्यमातून योग्यप्रकारे राबवला जाईल.

| | |
|---|---|
| भाजप | 89 |
| शिवसेना ठाकरे गट | 65 |
| शिवसेना | 29 |
| काँग्रेस | 24 |
| मनसे | 6 |
| एमआयएम | 8 |
| एनसीपी | 3 |
| एसपी | 2 |
| एनसीपी शप | 1 |

### ब्रेकिंग न्यूज

## संगीत मार्ग मुंबईकरांच्या सेवेत

मुंबई (दै. संध्या) : मुंबई महानगरपालिकेने उभारलेल्या धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज किनारी मार्गावर (मुंबई कोस्टल रोड) साकारण्यात आलेली संगीत रस्त्याची संकल्पना वाहनधारकांना आनंद देणारी आहे. हंगेरियन तंत्रज्ञानावर आधारित ही अभिनव संकल्पना यापुढेही राबविण्याचा मानस आहे, असे उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तर समृद्धी महामार्गावरही प्रायोगिक तत्त्वावर ही संकल्पना राबविण्याचा विचार करू.मुंबई किनारी रस्त्यावर साकारलेल्या संगीत मार्गाचा मुंबईकरांनी आनंद घ्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुंबई किनारी रस्त्यावर नरिमन पॉईंटकडून वरळीकडे जाणाऱ्या उत्तर मार्गिकेवर साकारलेल्या संगीत मार्गाचे (मेलोडी रोड) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बुधवारी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकार्पण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी वाहनात बसून 'स्लमडॉग मिलेनियर' या चित्रपटातील 'जय हो' या गीताची धून ऐकत संगीत मार्गाचा आनंद घेतला. हंगेरीचे वाणिज्य दूत फॅरेन जारी, माजी खासदार राहुल शेवाळे, अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## दोरी घासून गळा कापला!

पुणे (दै. संध्या) : दुचाकीवरून दोघे मित्र जात असताना अचानक गळ्याला मोठी दोर अडकून त्यांचा अपघात होतो. यात दुचाकीस्वाराला मोठी दुखापत होऊन त्याचा गळा चिरल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडतो. नेमके काय झाले हेच कळत नाही आणि एकच खळबळ उडते. स्थानिक नागरिकांकडून त्वरित दोघांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. हा प्रकार घडला आहे कर्वेनगर येथील मेघराज सोसायटीच्या समोर. सोसायटीकडून व त्यांच्या ठेकेदाराने झाडाच्या फांद्या तोडताना नियमांचे पालन न केल्याने हा निष्काळजीपणा तरुणाच्या जिवावर उठला आहे. रामेश्वर अवतीकर असे गंभीर झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्यासोबत तरुणाचा मित्र सुधीर लांडगे हा तरुणही जखमी झाला आहे. (ता. ११) दुपारी दोनच्या सुमारास कर्वेनगर येथे अलंकार पोलिस ठाण्याच्या जवळ हा प्रकार घडला.

## गिल्बर्ट हिल येथे नियम उल्लंघन प्रकरणी अहवाल सादर करावा : पंकजा मुंडे

**मुंबई (दै. संध्या)**

गिल्बर्ट हिल हा परिसर पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील व महत्त्वपूर्ण आहे. हा भाग हरित क्षेत्रात मोडत असून, येथे प्रकल्प विकसित करताना नियमांचे उल्लंघन झाल्याच्या अनुषंगाने संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून वस्तुस्थितीची माहिती घेऊन कार्यवाही करावी, अहवाल सादर करावा, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, महसूल विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन



प्राधिकरण आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, अंधेरी पश्चिम येथील गिल्बर्ट हिल परिसरात अनधिकृत बांधकाम झाल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर हा भाग हरित क्षेत्रात मोडत असून आवश्यक परवानग्या व नियमांची पूर्तता अनिवार्य आहे.

## निष्ठा, प्रामाणिकता आणि जबाबदारीतूनच खरे यश मिळते

**मुंबई (दै. संध्या)**

■ विधानपरिषद उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे : मुख्यमंत्री फेलोशिप' व 'विधि विधान इंटर्नशिप' तुकडी अभ्यासभेट

सामाजिक प्रश्न सोडविताना निष्ठा, प्रामाणिकता आणि जबाबदारीतूनच खरे यश मिळते. प्रश्न फक्त प्रसिद्धीसाठी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या हितासाठी मांडले गेले पाहिजेत, असे प्रतिपादन विधानपरिषद उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

विधानभवनात 'मुख्यमंत्री फेलोशिप' कार्यक्रमअंतर्गत कार्यरत फेलोजची सातवी तुकडी तसेच 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची पाचवी तुकडी यांच्यासाठी अभ्यासभेट, मार्गदर्शन व चर्चा-संवाद आयोजित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे



सचिव-३ डॉ. विलास आठवले, कार्यक्रम समन्वयक प्रिया खान, सह सचिव नागनाथ थिटे, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक निलेश मदाने आणि मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमातील सातवी तुकडी आणि 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमातील विद्यार्थी उपस्थित होते. 'मुख्यमंत्री फेलोशिप' कार्यक्रमातील सातवी तुकडी आणि 'विधि विधान इंटर्नशिप' उपक्रमातील पाचवी तुकडी यांच्या अभ्यासभेटी व मार्गदर्शन सत्रात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी फेलो व इंटर्न्सना मार्गदर्शन केले. या संवादात्मक सत्रात उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी कायदे, शासनाच्या योजना आदी क्षेत्रांचा सखोल अभ्यास करून समाजहिताचे कार्य करण्याचे आवाहन केले. स्वतःसाठी वेळ देण्याचे, निसर्ग, संगीत व छंद यांच्या माध्यमातून तणाव व्यवस्थापनाचे महत्वही डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले. सतत लोकांशी जोडून राहणे आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे. हेच खरे लोकप्रतिनिधित्व आहे, असे त्यांनी नमूद केले.

या मार्गदर्शन सत्रात फेलो व इंटर्न्सनी विविध सामाजिक व धोरणात्मक प्रश्नांवर विचारमंथन केले. डॉ. गोऱ्हे यांनी त्यांच्या उत्सुकतेचे कौतुक करून, प्रश्नांची मांडणी करताना तथ्य, पुरावे आणि सखोल माहिती वापरणे गरजेचे असल्याचे सांगत त्यांना भविष्यातील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

## एकनाथ खडसेंच्या अडचणी वाढल्या, सावदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**मुंबई (दै. संध्या)**

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांच्याविरोधात जळगावच्या सावदा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक तसेच गृहमंत्री यांच्याबद्दल अर्वाच्य भाषा वापरत अरेरावी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यामुळे आता एकनाथ खडसे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. गुन्हा दाखल झाल्याच्या वृत्ताला पोलीस अधिकाऱ्यांकडून दुजोरा देण्यात आला आहे. सावदा पोलीस स्टेशनमध्ये एका गौण खनिज चोरीच्या प्रकरणात पोलिसांना जाब विचारताना एकनाथ खडसेंनी अर्वाच्च शब्दात अरेरावी केल्याची माहिती समोर येत आहे. मात्र दुसरीकडे या संदर्भात फोनवरून माहिती देताना



एकनाथ खडसेंकडून त्यांच्याविरोधात तक्रारीत केलेल्या आरोपांचे खंडन करण्यात आले आहे. एकनाथ खडसे यांच्या अडचणी वाढल्या आहेत, एकनाथ खडसे यांच्याविरोधात जळगावच्या सावदा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक तसेच गृहमंत्री यांच्याबद्दल अर्वाच्य भाषा वापरत अरेरावी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. मात्र एकनाथ खडसे यांनी आपल्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. 'गौण खनिज प्रकरणात चौकशीसाठी सावदा पोलीस स्टेशनमध्ये गेलो, मात्र त्यावेळी माझ्याकडून एक चुकीचा शब्द निघाल्याने पोलीस निरीक्षकाची आपण माफी मागितल्याची माहिती एकना खडसे यांनी फोनद्वारे दिली आहे.' या प्रकरणात सावदा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांनी एकनाथ खडसे यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे. विधानपरीषद सदस्य एकनाथराव गणपतराव खडसे रा. मुक्ताईनगर हे सावदा पोलीस स्टेशनच्या आवारामध्ये दाखल झाले, त्यानंतर त्यांनी तासखेडा ता. रावेर येथील गौणखनिज संदर्भात गुन्हा दाखल का केला नाही ? अशी आमच्याकडे विचारणा केली. त्यानंतर ते आम्हाला अत्यंत अपमानास्पद बोलले तसेच आमच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा ट्रॅप लावतो अशी धमकी देखील त्यांनी यावेळी दिली, आम्हाला दमदाटी देखील केली, असं या तक्रारीमध्ये म्हटलं आहे. महाराष्ट्र शासनाचे मंत्री यांना अश्लील भाषेत मोठमोठ्याने शिवीगाळ केली, असा आरोप देखील यावेळी खडसेंविरोधात करण्यात आला आहे, या प्रकरणात आता खडसेंविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सर्व ग्रामपंचायतींनी शंभर टक्के सहभाग घेण्याच्या सूचना

**मुंबई (दै. संध्या)**

आदिशक्ती अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व राज्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित बैठकीत त्यांनी आदिशक्ती अभियानाच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीस सचिव डॉ. अनुप कुमार यादव, आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बालविकास सेवा योजनाचे कैलास पगारे, राज्य महिला आयोगाचे सचिव नंदिनी आवडे, विभागाचे सहसचिव विलास ठाकूर व उपसचिव आनंद भोंडवे उपस्थित होते. उपायुक्त जामसिंग गिरासे यांनी सादरीकरण केले. या बैठकीमध्ये



राज्यातील सर्व जिल्हा कार्यक्रमाधिकारी व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ऑनलाईन पद्धतीने बैठकीस उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी महिला सशक्तीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची प्रभावी व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी करण्यावर भर दिला.

# सायक्लोथॉन उपक्रमातून देशाची एकात्मता आणि अखंडत्वाचे दर्शन

## विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर : वंदे मातरम् ' सुरक्षित तटम समृद्ध भारतम्' सायक्लोथॉन उपक्रम

**मुंबई (दै. संध्या)**

विविध सुरक्षा दलांमुळे देशात विविध भाषा, संस्कृती असतानाही राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडत्व कायम आहे. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वंदे मातरम् सुरक्षित तटम समृद्ध भारतम्' सायक्लोथॉन उपक्रमातून देशाच्या एकात्मता आणि अखंडत्वाचे दर्शन घडत आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी केले.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) वतीने गेट वे ऑफ इंडिया परिसरात आयोजित सायक्लोथॉन उपक्रमातील सायकलपटूंच्या स्वागत कार्यक्रमात विधानसभा अध्यक्ष ॲड.नार्वेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे महासंचालक प्रवीण रंजन, अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे, विजय कुमार, क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर, दिग्दर्शक बोनी कपूर, अभिनेता अहान शेट्टी, विश्वचषक विजेत्या १९ वर्षाखालील क्रिकेट संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे उपस्थित होते.

विधानसभा अध्यक्ष ॲड नार्वेकर म्हणाले, भारताने जगाला अनेक तत्वे दिली आहेत. त्यापैकी जग हे एक कुटुंब असल्याचे ' वसुधैव कुटुंबकम तत्व आहे. विकसित भारतासाठी सुरक्षा दलांचे मोठे सहकार्य राहणार आहे. भारत हा जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. लवकरच आपण तिसऱ्या स्थानावर झेप घेणार आहोत. आज आपण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झालो आहोत. सीआयएसएफ ने देशाच्या प्रगतीत मोठे योगदान दिले आहे. देशाच्या अंतर्गत सुरक्षेत सीआयएसएफचे कार्य उल्लेखनीय आहे. सायक्लोथॉन हा उपक्रम लोकपयोगी आहे. महासंचालक प्रवीण रंजन म्हणाले, प्रत्येक व्यक्तीच्या मनात राष्ट्र भावना जागृत करणे हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. या संकल्पपूर्तीसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल देशाच्या एकात्मकतेसाठी सागरी किनारी भागात हा उपक्रम राबवित आहे.



सीआयएसएफची ४७ युनिट सागरी किनारी भागात आहे. किनारी गावांमध्ये सागरी सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. ग्रामस्थांशी संवाद करून त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना सागरी सुरक्षेविषयी जागरूक करण्यात येत आहे. गुजरातमधील लखपतपासून सुरू झालेला सायकलपटूंचा २ हजार ३५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण झाला असून अजून १३०० किलोमीटर प्रवास पूर्ण व्हायचा आहे. तसेच पूर्व भागात सायकलपटूंचे पथक चेन्नई येथे पोहचणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अतिरिक्त महासंचालक पद्माकर रणपिसे म्हणाले, सागरी किनारी मार्गावरील छोट्या गावांमध्ये सायकलपटू रात्रीचा मुक्काम करीत आहेत. या उपक्रमातून सागरी सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे जात आहे. सायकलपटूंच्या पथकामध्ये ५० टक्के महिला शक्ती आहे.

# संपादकीय

## अखेर ती वेळ आलीच !

जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते,की आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे. त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते, ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणजेच महापौर पदासाठी शनिवारी भाजपतर्फे अर्ज भरण्यात आला. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणून रितू तावडे यांचे नाव निश्चित झाले. विरोधी पक्षातर्फे कोणाचेही नाव निश्चित न झाल्याने आता बुधवारी रितू तावडे या महापौर बनणार हे निश्चित. म्हणजे आता मुंबई महानगरपालिकेचा कारभार पुन्हा पाच वर्षांनी का होईना सुरू होणार हे महत्त्वाचे. त्याचप्रमाणे इतर समित्यांचेही अध्यक्ष ठरतील आणि मुंबईकरांच्या समस्यांना कोणीतरी वाली निर्माण होईल व समस्या सुटतील अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. एकदा का वैधानिक समित्या सुरू झाल्या, की पालिकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू होईल. पाच वर्षे हीच सत्ता अधिकाऱ्यांच्या हातात होती. भले राज्यातील सत्ताधारी यावर नियंत्रण ठेवून होते मात्र काही प्रमाणात पालिका अधिकाऱ्यांची मनमानी एकाधिकार शाही सुरू होती, त्यावर आता चाप बसेल व अंकुश ठेवणे सोपे जाईल कारण आता खरेखुरे ट्रस्टी खऱ्या अर्थाने जनतेने निवडून दिलेले सेवक म्हणजेच नगरसेवक यांचा यावर अधिपथ्य स्थापन होईल आणि अशी अपेक्षा जनतेची असेल. जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे किंवा नवीन सुविधा निर्माण करणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे हेच व त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते,ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा. मुंबईचे महापौर या पदावर स्थानापन्न झाल्यावर लगेच स्थायी समिती, आरोग्य समिती, बेस्ट समिती यासारख्या समित्याही लवकरच स्थापना केल्या जातील व त्यांचे अध्यक्ष घोषित होतील. मुंबई महानगरपालिकेचे सध्या सर्व आलबेल चालले असले, तरी मुंबई महानगरपालिकेच्या एक अविभाज्य अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची मात्र सध्या अवस्था बिकट झाली आहे. एक चांगला उपक्रम प्रशासनावरच्या व राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षपणामुळे कशाप्रकारे मोडीस निघतो याचे उदाहरण म्हणजे बेस्ट उपक्रम. आज मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. निदान कर्मचाऱ्यांचे वेतन तरी वेळेवर होते. मात्र त्याच दुसरीकडे बेस्ट उपक्रमाकडे वेतन द्यायलाही महिना अखेर पैसे उपलब्ध होत नाही. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रचंड पैसा खर्च होतो. म्हणून पालिकेच्या दबावाने बेस्टवर खाजगीकरण मोठ्या प्रमाणात लादले गेले. मात्र दुसरीकडे मात्र पालिकेचे खाजगीकरण त्या प्रमाणात होऊ शकले नाही. मात्र बेस्ट उपक्रमात बेस्ट कर्मचारी बस गाड्यांपासून इतर सर्व गोष्टी कंत्राटदारांमार्फत मुंबईकरांवर लादल्या गेल्या.आज त्याचाच परिणाम म्हणजे कंत्राटीकरण झालेल्या बेस्ट बस गाड्यांमुळे प्रवाशांनाच मोठ्या प्रमाणावर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बेस्ट बस गाड्यांची संख्या कमी झाली, नवीन बस वेळेवर येत नाही, रस्त्यावरील बस गाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी झाली, बस गाड्यांवर काम करण्यास कंत्राटदारांना अपुऱ्या वेतनामुळे कर्मचारी मिळत नाही, त्यामुळे प्रवासी घटले व बेस्टचे उत्पन्नही घटले. खरंच खाजगीकरणामुळे बेस्ट उपक्रम फायद्यात येऊ शकेल का? मात्र त्याचे उत्तर अजूनही नाही असेच म्हणावे लागेल. कारण ज्या मोठ्या प्रमाणावर बेस्टला तोटा होत होता तो कमी करण्यासाठी खाजगीकरण आणले गेले असे समर्पक उत्तर मिळते. मात्र एकेकाळी दोन ते तीन हजार करोडचा निव्वळ तोटा असलेला बेस्ट उपक्रम आज तब्बल १३ ते १४ हजार करोड तोट्यात गेला. आतापर्यंत मुंबई महानगरपालिकेने बेस्ट प्रकरणास आपली पालक संस्था म्हणून आठ ते नऊ हजार करोड रुपये दिलेत. त्यामुळे बेस्ट उपकरणाचा तोटा काही अंशी भरून निघत आहे. मात्र आता मुंबई महानगरपालिकेनेही हात वरती केला असून बेस्ट उपक्रम लवकरच सुधारला नाही तर यापुढे मदत मिळणार नाही असे फर्मान सोडले आहे.

## संस्कृत सुभाषित

विद्यावत: कुलीनस्य धनं याचि तुमिच्छत:।
कण्ठे पारावतस्येव वाक्करोति गतागतम्।।

अर्थ : कुलीन विद्वानांवर जेव्हा द्रव्य याचनेचा प्रसंग येतो, तेव्हा त्यांचे शब्द कबुतरासारखे कंठातच घुटमळतात.

## गुरु वचन

### सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे-श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती-प्रेम-समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सदगुण-संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

## उपदेशकथा

### प्रयत्न, परिश्रम अन परमेश्वर

ही गोष्ट साधारण १९३७-३८ सालातली आहे. सोळा-सतरा वर्षाचे युवा नौशाद लखनौहून काहीतरी कामगिरी करण्यास बाहेर पडले होते. मुंबईत एक विद्वान प्राध्यापक नामीसाहेब कुलाब्यात राहात. त्यांच्या घरी ओळखीनं नौशाद राहात व दिवसभर कामाच्या शोधात स्टुडिओतून फिरत असत. मुंबईच्या भुलभुलैयात गरीब स्वभावाच्या नौशादचे पाकिट हरवले. जवळच पुंजी संपली. पण त्यांनी प्रयत्न मात्र सोडले नाहीत. कुलाब्यापासून दादरपर्यंत पायी चालून आलेल्या व दमून झोपलेल्या नौशादाकडे नामीसाहेबांचे लक्ष गेले. त्यांचे जोडेदेखील फाटून गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी नौशादकडून सर्व हकीकत समजली. पैशाशिवाय या मुंबईत चिकाटीनं राहणाऱ्या नौशादचं त्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले, 'तू एक दिवस मोठा माणूस होणार आहेस व त्यावेळी मी तुला नक्की भेटेन.' त्यानंतर स्वत: गरीब असलेल्या नामीसाहेबांनी त्यांना थोडे पैसे दिले व नौशाद यांच्या डायरीत आपले शब्द टिपून ठेवले. पुढे काळ गेला धर्मपारायण नौशाद यांनी परिश्रमानं, प्रयत्नानं चित्रपटसृष्टीत मोठं नाव कमावलं. स्वत:ची मोठी वास्तू केली. 'बैजू बावरा'च्या यशानं त्यांचं नाव गाजू लागलं. एके दिवशी नामीसाहेब त्यांना भेटायला आले व त्यांना डायरीतल्या पत्राची आठवण करून दिली. त्यांचे शब्द खरे झाले होते.

कथा उपदेश : प्रयत्न आणि परिश्रमाच्या जोडीला परमेश्वरावर श्रद्धा असेल तर जीवनात यश नक्की आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:ज्येष्ठा १३:४२:०३ |
| १२ फेब्रुवारी २०२५ | योग:हर्षण २७:०५:१८+ |
| गुरूवार | करण:विष्टि १२:२२:२६ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:बव २५:२७:२२+ |
| माघ शके संवत्- १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर - विश्वावसूनाम | चन्द्र:धनु१३:४२:०३ |
| अयन- उत्तरायणारंभ | हिजरी सन् - १४४६ |
| मास- माघ | मुस्लिम मास - शाबान |
| ऋतु- सौर शिशिर | तारीख - २३ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:दशमी १२:२२:२६ | शुभ दिवस |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८५८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८५७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | 3 | 4 | 6 | 1 | 2 | 7 | 5 |
| 4 | 7 | 6 | 8 | 2 | 5 | 1 | 3 | 9 |
| 5 | 2 | 1 | 9 | 7 | 3 | 4 | 6 | 8 |
| 8 | 6 | 4 | 2 | 1 | 9 | 7 | 5 | 3 |
| 7 | 1 | 9 | 3 | 5 | 8 | 6 | 2 | 4 |
| 3 | 5 | 2 | 7 | 4 | 6 | 8 | 9 | 1 |
| 1 | 9 | 7 | 5 | 8 | 2 | 3 | 4 | 6 |
| 6 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 9 | 8 | 2 |
| 2 | 3 | 8 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८७४ - संडवीच आयलंड हायचे राजा डेव्हीड कलाकुआ यूएसला प्रथम भेट देणारे पहिले राजा बनले.
- १९३८ - जर्मन सेनाचे ऑस्ट्रेयात प्रवेश.
- १९६० - चीनी सेनाकडून १२ भारतीय सैनीकांची हत्या.
- २००७ - श्रीलंकेच्या नौसेनाने लिट्टेची नौका बुडवली,१० जण ठार.
- २००७ - बगदादमध्ये तीन बॉम्ब स्फोटात ६४ ठार; दीडशे जखमी.
- २००८ - पूर्वी तिमोरच्या राष्ट्राध्यक्षांची गंभीर प्रकृतीला पाहता प्रशासनाने देशात दोन दिवसासाठी आणीबाणी लागू केली.

### राष्ट्रीय

- २००८ - १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील प्रमुख आरोपी टायगर मेमन याची मेव्हणी रूबीना मेमन हिने जामिनासाठी केलेला अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला आणि तिची जन्म ठेपेची शिक्षा कायम ठेवली.
- २००८ - भारतीय कर्णधार महेंद्रसिंग धोनीने आपल्या १०० व्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात ३ हजार धावा पुर्ण केल्या.

### जन्म

- १२११ - जर्मन राजा हेन्री सातवा यांचा जन्म.
- १८०९ - अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचा जन्म.

### निधन

- १७७१ - अडल्फ फ्रीड्रीक, स्वीडनचे राजे यांचे निधन.
- २००८ - लक्ष्मण सिंग गौड, मध्यप्रदेशचे शिक्षणमंत्री यांचे निधन.
- २००८ - भारत-अमेरिका नागरी अणु करारावर स्व.हेनरी हाईड यांच्यासमवेत मिळून अमेरिकन कायद्याचा मसुदा तयार करणारे टॉम लेटॉस यांचे निधन.

## : SMS :

AEROPLANE -Wright Brothers
CYCLE -Macmillan
TELEPHONE- Graham Bell
TELESCOPE-Galieo
T.V-Baird
LOVE-Adam,
MARRAGE-Dhundo saale ko,Pakad ke Marenge!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.७ | १७.८ |
| अहमदनगर | २८.१ | १७ |
| अकोला | ३१.२ | १६.५ |
| अमरावती | ३०.१ | १७ |
| बीड | ३०.६ | १४.६ |
| भंडारा | ३०.२ | १४.३ |
| बुलढाणा | २३.६ | १०.५ |
| चंद्रपूर | ३०.५ | १७.४ |
| चेन्नई | ३०.२ | २१.८ |
| नवी दिल्ली | २५.६ | ११.५ |
| धुळे | ३०.८ | १७.९ |
| गोंदिया | २८.८ | १५.१ |
| जळगाव | ३१.१ | १६.५ |
| कोल्हापूर | २९.६ | १४ |
| लातूर | २९.४ | १७ |
| मुंबई | ३०.७ | २३.३ |
| नागपूर | २९.३ | १५ |
| नांदेड | ३०.५ | १७.१ |
| नंदूरबार | २९.३ | १६.९ |
| नाशिक | २९.६ | १४ |
| पुणे | २८.९ | १६.६ |
| पंढरपूर | २९.६ | १६.२ |
| सातारा | ३०.१ | ११.५ |
| सांगली | ३०.४ | १५.४ |
| सोलापूर | ३०.३ | १७.७ |
| वर्धा | ३०.६ | १५.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम सहकार्य व चांगले संबंध यामुळे आर्थिक लाभ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर दूरदर्शीपणा व बुद्धीच्या जोरावर अडचणींचा सामना कराल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम आपल्या बुद्धीमत्तेची व दुरदर्शीपणाची समाजात स्तुती होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग : निळा,शुभ दिशा:पूर्व आपल्या प्रयत्नामुळे आपली स्थिती मजबूत कराल. कौटुंबिक सामजस्य राहील. आर्थिक फायदा होईल.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व नोकरीत मनासारखी बदली किंवा पदोन्नती मिळण्याचे योग आहेत. स्थावर मालमत्तेपासून फायदा मिळेल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व मागील काही दिवसापासून अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण होतील.प्रयत्नामुळे घरगुती वाद मिटणार आहे.

**कर्क :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर आपला प्रभाव वाढल्याने शत्रू परेशान होतील. सर्व कामे वेळेत पूर्ण होतील. वाचनाची गोडी वाढणार आहे.

**मकर :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर दाम्पत्य जीवनात कटुता येईल. रचनात्मक कामाचे फळ चांगले मिळेल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वडिलांच्या मार्गदर्शनाने व्यवसायातील अडचणी दूर होईल.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर कौटुंबिक तणाव वाढणार आहे त्यामुळे अजिविकामध्ये अडचणी येतील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**कन्या :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: पश्चिम शत्रू आपल्या कामात बाधा आणण्याचा प्रयत्न करतील. भविष्याची काळजी राहील.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व संपत्ती संबंधीत असलेल्या कामात केलेली धावपळ फायदेशीर राहील. आर्थिक लाभ वाढणार आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५८



### आडवे शब्द

१. बारमाही फुलणारे फूल
४. हवामान, स्थिती
७. चंद्र
११. दयाळू
१३. निकृष्ट दर्जाचे
१४. एकरूपता
१५. च्या सह
१७. वास्तुभोवतीचा परिसर
१८. आदर, सन्मान
१९. भादुरी पण जया नव्हे!
२०. वाहून नेणारा
२२. लहान
२३. पक्ष, बाजू
२५. अंधार
२६. दार, कवाड
२८. लोक, प्रजा
२९. मनाला टोचणारे दु:ख
३०. हे माणसाला नादान बनवते?
३१. लाडवाला घडवणारा किंवा बिघडवणारा!
३२. जेव्हा
३३. राग अणणारे (कृत्य)
३५. ही गहाण ठेवून काय होणार!
३६. मारला गेलेला
३७. आयुष्यभर
३८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
३९. ललाट
४१. प्राण, जीव (हिंदी)
४२. आणि
४३. शिक्षा
४५. सोंग वठवणारा
४७. फाडलेल्या दुधाच्या वड्या
४८. आई
५०. राजाचा निरोप्या, वकील इ.
५२. सोन्याचा कस
५३. नाद, छंद, सरावाने घडणारी गोष्ट
५४. खबदाड
५५. मंगळवारची चतुर्थी
५७. रोड, अशक्त
६०. घर
६२. अटीची भाषा
६३. आंदोलन, लढा
६४. महात्मा गांधीजींचे अखेरचे शब्द
६५. बाळाच्या अंगावरची तेलहळदीने जाते
६६. थरथर
६७. गाभाऱ्यात तेवणारी
६८. कोणाचा खालच्या पट्टीतला कोणाचा वरच्या
६९. ऱ्हास
७१. दशानन
७२. हिंदीत रहस्य
७३. गाढव
७४. ऐट, दिमाख
७७. वाणी, बोलणे
७९. मधुमक्षिका
८१. प्रश्न
८२. एखादे काम करण्यास समर्थ
८३. अतिशय वेदना

### उभे शब्द

१. पातळसर
२. मोफत
३. नम्र, वाकलेला
४. रेती
५. राबता, पायंडा
६. फलंदाजाऐवजी धावपळ करणारा
७. फूल, पुष्प
८. पात्याची तीक्ष्णता
९. सत्त्व
१०. उपवासाला चालणारा कंद
१२. बातमीदार
१४. सम, सारखा
१६. खेळातून हद्दपार
२०. वाद्यवृंदातील कलाकार
२१. सैन्याची परेड
२२. छोटा
२३. केस काळे करणारा
२४. जन्मदाते
२७. जास्त
२८. होडी, जहाज इ.
२९. एक तारवाद्य
३०. राक्षस
३१. शिक्षणव्यवस्थेच्या त्रिकोणापैकी विद्यार्थी-शिक्षकांबरोबरचा तिसरा
३३. शक्यता असलेले
३४. ज्या प्रमाणे
३५. अमावस्या
३६. दुष्ट, नीच
३७. सहस्त्र
४०. पर्ण
४४. जादू करणारा
४६. भ्रष्टाचार
४७. वारा, मरूत
४८. टोकिओ या देशाची राजधानी
४९. पुरुष
५१. शहाणा, हुशार
५४. पाऊल (हिंदी)
५५. हनुमानाची माता
५६. पोपट
५८. वेदना, खटका
५९. डावरा
६०. निष्णात, वाकबगार
६१. चीजवस्तू
६४. सुवर्ण
६५. नुसताच शोभेचा फौजफाटा
६७. उत्सवाचे दिवस
६८. पूजा, प्रार्थना इ.
६९. उद्यानंतरचा दिवस
७०. धुंदी, कैफ
७३. वाळा
७५. शरीरातील नाडी
७६. कौसल्यापुत्र
७८. चक्र
७९. अभिप्राय
८०. अब्रू

### जम्बो शब्दकोडे क्र. ८५७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.गजानना श्री गणराया आधी वंदू तुज १०.गळ ११.दर १२.नवा १४.गाजर १५.कणखर १७.दामिनी १८.उमाळा १९.पाकळी २१.रसदार २३.यजमान २५.लव २६.काव २८.सम ३१.डफ ३३.समरभूमी ३६.मन ३८.भरमसाट ४०.पटकथा ४१.रवाना ४२.कलाकार ४५.तन ४६.आळ ४७.दयाहीन ४९.कारण ५०.गीताई ५२.पडछाया ५३.सार ५६.दमा ५७.आर ५८.चपखल ६०.आपपरभाव ६३.नजर ६५. ताडमाड ६७.जरतर ६९.नमाज ७१.टपाल ७३.फर ७४.भात ७५.नवीन ७७.रग ७८.चुली ८०.पसा ८२.वाळका ८४.अनघड ८५.आटपाटनगर ८६.कडबा

उभे उत्तर : १.गजगामिनी २.नगरपाल ३.नाळ ४.गहाण ५.रामरस ६.आमदार ७.वंदनीय ८.दूर ९.जनम ानस १३.वाळा १५.कळी १६.खरवस १८.उमा २०.कवडसा २२.दादर २४.जळमट २७.मामी २९.मस्त ३०.पवानगी ३२.फटकळ ३४.मगर ३५.भूतदया ३७.नकलाकार ३८.भरत ३९.मना ४०.पतन ४३.कापडचोपड ४४.सणवार ४६.आई ४७.दया ४८.हीन ५१.तारीख ५३.सामान सामान ५४.अचकट ५५.आभार ५७.आरमार ५९.लता ६०.आमार ६१.रजतपट ६२.वतन ६४.जन ६६.डफली ६८.रविवार ७०.जगदंबा ७२.पावन ७६.नळ ७८.चुड ७९.भाट ८१.सान ८३.काक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### लालबाबा इंजिनिअरिंगने पीएलआय योजनेअंतर्गत केला सामंजस्य करार

पुणे (दैनिक संध्या) : कोलकाता येथे मुख्यालय असलेल्या सीमलेस ट्यूब्सच्या एकात्मिक उत्पादक लालबाबा इंजिनिअरिंग लिमिटेडने भारत सरकारच्या स्पेशॅलिटी स्टीलसाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजना १.२ अंतर्गत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या योजनेचा उद्देश देशांतर्गत स्टील उत्पादनाला बळकटी देणे हा आहे. स्टील मंत्रालयाने आयोजित केलेल्या अधिकृत स्वाक्षरी समारंभात विज्ञान भवन येथे सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली, ज्यामध्ये मेकॉन लिमिटेड या योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन संस्था म्हणून कार्यरत आहे.या मंजुरीमध्ये धोरणात्मक क्षेत्रासाठी मिश्र धातु स्टील आणि स्टेनलेस स्टीलच्या लांब उत्पादनांचा समावेश आहे. ही योजना कालमर्यादित, उत्पादनाशी संलग्न अशी असून, आयात पर्यायांना प्रोत्साहन देणे, देशांतर्गत मूल्यवर्धन वाढवणे आणि उच्च दर्जाच्या स्टील उत्पादनांमध्ये भारताची जागतिक स्पर्धात्मकता मजबूत करणे, हा तिचा उद्देश आहे. या विकासावर भाष्य करताना, लालबाबा इंजिनिअरिंग लिमिटेडचे संचालक निकुंज धानुका म्हणाले: पीएलआय योजनेअंतर्गत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणे हे राष्ट्रीय उत्पादन प्राधान्यांशी सुसंगत असलेल्या विशेष स्टीलवर बांधलेल्या देशांतर्गत सीमलेस ट्यूब उत्पादन क्षमतांना पुढे नेण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.तसेच, पश्चिम बंगालमधील हल्दिया येथे प्रस्तावित कोल्ड-फिनिश्ड सीमलेस ट्यूब्स विस्तार प्रकल्प देखील या योजनेअंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र ठरणार आहे.

### संयम आणि भावनिक सामर्थ्य आत्मसात करण्यास मदत : अविनेश रेखी



पुणे (दैनिक संध्या) : संपूर्ण देश महाशिवरात्रीच्या पावन उत्सवाची तयारी करत असताना, सोनी सबवरील गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय या मालिकेत भगवान शिवाची प्रभावी आणि करुणामय भूमिका साकारणारे अभिनेता अविनेश रेखी यांनी या उत्सवाचा गहन अर्थ आणि या भूमिकेने त्यांच्यावर केलेला खोल परिणाम यावर चिंतन केले.महाशिवरात्री हा उत्सव अंतर्गत जागृती, संतुलन आणि उच्च चेतनेसमोर समर्पणाचे प्रतीक आहे. यंदा हा उत्सव अविनेश यांच्यासाठी विशेष ठरला आहे. भगवान शिवाची भूमिका साकारताना त्यांचा प्रवास आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध झाला असून, त्यांना सामर्थ्य, करुणा आणि जबाबदारी नव्या दृष्टिकोनातून अनुभवता आली आहे. महाशिवरात्रीच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल बोलताना अविनेश म्हणाले, "महाशिवरात्री हा फक्त उत्सव नाही, तर थांबून विचार करण्याचा आणि आपल्या अंतरात्म्याशी पुन्हा जोडून घेण्याचा एक संदेश आहे. गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिवाची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत नम्र करणारा आणि परिवर्तनकारी अनुभव ठरला आहे. भगवान शिव हे केवळ सामर्थ्याचे देव नाहीत, तर अपार शांतता, करुणा आणि संतुलनाचे प्रतीक आहेत. या पात्रासोबत दररोज जगताना मला स्थिरतेचे आणि श्रद्धेचे महत्त्व समजले, विशेषतः आजच्या वेगवान जगात." ते पुढे म्हणाले की या उत्सवामुळे मालिकेतील त्यांचा अनुभव अधिक खास झाला आहे. ते म्हणाले, "गणेश कार्तिकेय मधून आम्ही भगवान शिवाला केवळ दुष्टांचा संहारक म्हणून नव्हे, तर आपल्या पुत्र भगवान गणेश आणि भगवान कार्तिकेय यांचा जिव्हाळ्याचा पिता आणि मार्गदर्शक शक्ती म्हणूनही दाखवत आहोत. भगवान शिवाची भूमिका साकारताना मला संयम, नम्रता आणि भावनिक सामर्थ्य आत्मसात करण्याची शिकवण मिळाली. या पवित्र महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी प्रार्थना करतो की भगवान शिव सर्वांना आशीर्वाद देवोत आणि ही रात्र प्रत्येकाच्या जीवनात परिवर्तन आणि सकारात्मकता घेऊन येवो." गणेश कार्तिकेय पाहण्यासाठी दर सोमवार ते शनिवार रात्री 8 वाजता, फक्त सोनी सबवर.

### शहरात वाहतूक विभागाकडून 1454 वाहनांवर कारवाई

पुणे (दैनिक संध्या) : रस्त्यावरून बेधडकपणे ट्रिपलसीट जाणाऱ्या वाहनांवर वाहतूक विभागाने कारवाईचा बडगा उगारला असून, पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेदरम्यान पुणे शहरातील विविध प्रमुख रस्ते, चौक व वाहतूक दाटीच्या ठिकाणी एकूण १४५४ ट्रिपलसीट वाहनांवर कारवाई केली आहे. याशिवाय २१४४ चलन पेड करून १६ लक्ष १८ हजार ४०० रुपये शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात आले आहेत. वाहतूक पोलिसांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार व सहपोलीस आयुक्त व अपर पोलिस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील रस्त्यांवर ट्रिपलसीट वाहनांवर कारवाईची विशेष मोहीम राबविण्यात आली. एकूण ५९२१ जणांवर चलन कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये पुणे शहर वाहतूक विभागातील ३० वाहतूक विभाग तसेच ४४ पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# 'यूपीआय'चा वापर जगभर वाढतोय; सुरक्षा व नियंत्रणाचे काय?

**खासदार मेधा कुलकर्णी यांनी वेधले लक्ष; सुरक्षा व तांत्रिक उपायांना प्राधान्य देत असल्याचे अर्थमंत्र्यांचे उत्तर**

पुणे (दै. संध्या) :

भारताच्या डिजिटल व्यवहार क्षेत्रातील युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसचा (युपीआय) जगभर विस्तार होत आहे. ही 'युपीआय' प्रणाली आठ देशांमध्ये कार्यान्वित किंवा स्थानिक पेमेंट प्रणालींशी संलग्न आहे. मात्र, 'युपीआय'च्या आंतरराष्ट्रीय विस्तारात येणाऱ्या नियामक, तांत्रिक व सुरक्षेशी संबंधित अडचणींकडे खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत तारांकित प्रश्नाद्वारे लक्ष वेधले.




राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात तारांकित प्रश्न उपस्थित करताना प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी यूपीआय कोणकोणत्या देशांमध्ये कार्यरत आहे, आंतरराष्ट्रीय जोडणीद्वारे झालेल्या व्यवहारांची संख्या व मूल्य, तसेच भारतीय प्रवासी आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने पुढील विस्ताराचा आराखडा काय आहे, याची माहिती सरकारकडून मागितली.

यावर लेखी उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यूपीआय सध्या भूतान, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, कतार, सिंगापूर, श्रीलंका आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) येथे कार्यरत असल्याचे सांगितले. गेल्या तीन आर्थिक वर्षांत आंतरराष्ट्रीय यूपीआय व्यवहारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, २०२३-२४ मध्ये ३७,०६० व्यवहारांवरून २०२५-२६ (डिसेंबर २०२५ अखेर) १४.८६ लाखांहून अधिक व्यवहार झाले आहेत. व्यवहार मूल्य १,९७० लाख रुपयांवरून ३३,०४३ लाख रुपये इतके वाढले आहेत, असे नमूद केले.

पुरवणी प्रश्नांद्वारे प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी यूपीआयला इतर देशांच्या पेमेंट प्रणालींशी जोडताना येणाऱ्या नियामक, तांत्रिक व द्विपक्षीय समन्वयाच्या अडचणी, तसेच त्याचा अंमलबजावणीच्या कालावधीवर व व्याप्तीवर होणारा परिणाम स्पष्ट करण्याची मागणी केली. याशिवाय डेटा लोकलायझेशन, सायबर सुरक्षा, मनी लॉन्डरिंग व दहशतवाद वित्तपुरवठा प्रतिबंध नियमांचे पालन आणि सेटलमेंट जोखीम यांसारख्या मुद्द्यांवर यजमान देशांच्या नियामकांनी व्यक्त केलेल्या चिंतेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

त्यावर उत्तर देताना अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी यूपीआयचा जागतिक विस्तार करण्याची जबाबदारी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एनपीसीआय), एनपीसीआय इंटरनॅशनल पेमेंट्स लिमिटेड या उपकंपनीकडे असल्याचे सांगितले. विविध देशांमधील तांत्रिक पायाभूत सुविधा, चलन विनिमय व्यवस्था, पेमेंट स्कीम्सचे मालकी हक्क आणि वेगवेगळ्या नियामक चौकटी यांमुळे आव्हाने निर्माण होत आहेत. मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि भागीदार देशांच्या समन्वयाने या अडचणी, तांत्रिक उपाय व द्विपक्षीय सहकार्याच्या माध्यमातून दूर करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सर्व अडचणी असूनही यूपीआय आठ देशांमध्ये यशस्वीपणे कार्यरत असल्याने भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर जागतिक स्तरावर विश्वास निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. परदेशात यूपीआयचा वाढता स्वीकार भारतीय प्रवाशांसाठी व्यवहार सुलभ करत असून, डिजिटल पेमेंट क्षेत्रात भारताची जागतिक नेतृत्वाची भूमिका अधिक मजबूत करत आहे. सरकारने भविष्यातही यूपीआयचा आंतरराष्ट्रीय विस्तार वाढवून सुरक्षित, जलद व परवडणाऱ्या सीमापार डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याची कटिबद्धता व्यक्त केली.

## खोटी माहिती देऊन पासपोर्ट काढल्यास गुन्हा दाखल होणार

पुणे (दै. संध्या) :

■ 'एआय'मुळे खोटी माहिती सादर करण्याचे प्रमाण वाढले

परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट काढताना काही जणांनी खोटी माहिती पासपोर्ट कार्यालयाला सादर केली. याचा त्रास खरी माहिती देणाऱ्याला होत आहे, तसेच अलीकडे 'एआय'मुळे खोटी माहिती सादर करण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारे खोटी माहिती देऊन पासपोर्ट काढण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत, असा इशारा पुणे विभागीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी दिला.पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने मंगळवारी (दि.१०) आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपविभागीय पारपत्र अधिकारी श्रुती पांडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, पारपत्र कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी जतीन पोटे आदी उपस्थित होते. डॉ. गायकवाड म्हणाले की, पासपोर्ट कार्यालयाचे कामकाज आता पूर्ण डिजिटल झाले असून, अपॉइंटमेंटपासून ते पासपोर्ट मिळेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन होते. शासनाने निर्धारित केलेली कागदपत्रे योग्य प्रकारे सादर केल्यास पासपोर्ट मिळण्याची प्रक्रिया सोपी व जलद होते. मात्र, अनेक अर्जदार आधी अर्ज भरतात आणि नंतर कागदपत्रांची जुळवाजुळव करतात. त्यामुळेच पासपोर्ट मिळण्यात अडचणी निर्माण होतात. आमचे उद्दिष्ट ३० दिवसांत अर्जदाराच्या घरी पासपोर्ट पोहोचविण्याचे आहे. काही प्रकरणांत तसे झालेही आहे. मात्र, बहुतांश वेळा अपूर्ण किंवा चुकीची कागदपत्रे सादर केल्यामुळे विलंब होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## शनिवारी मुठा नदी संवर्धनासाठी 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' उपक्रम

पुणे (दै. संध्या) :

■ वर्शिप अर्थ फाउंडेशन सह विविध संस्थांचा सहभाग : ट्रॅश बूम – नदी स्वच्छतेकडे शाश्वत पाऊल




मुठा नदीच्या संवर्धनासाठी व पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने वर्शिप अर्थ फाउंडेशन तर्फे राबविण्यात येणारा 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' हा उपक्रम दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजता भिडे पूल परिसर, नवी पेठ,मुठा नदी पात्र येथे राबविण्यात येणार आहे. यंदा उपक्रमाचे ६ वे वर्ष असून भव्य नदी स्वच्छता मोहीम व पर्यावरण जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना तसेच मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक सहभागी होणार आहेत, अशी माहिती वर्शिप अर्थ फाउंडेशनचे संस्थापक पराग मते यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला फाउंडेशनचे दिनेश कदम, आम्रपाली चव्हाण, समीर पौलस्ते, पीआयबीचे मीडिया अँड कम्युनिकेशन ऑफिसर हर्षल अकुडे, विद्यार्थी प्रतिनिधी अक्षणा कांबळे, हार्दिक सोनावणे, चैतन्य गर्जे, दुर्गेश बालके आदी उपस्थित होते. आम्रपाली चव्हाण म्हणाल्या, हा उपक्रम पुणे महानगरपालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सीबीसी – सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन (भारत सरकार), एनएसएस विभाग तसेच 'माय भारत' – युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. दिनेश कदम म्हणाले, नदी स्वच्छतेसाठी केवळ एकदिवसीय मोहिमा पुरेशा नाहीत. म्हणूनच आम्ही शिपको कंपनीच्या सहकार्याने मुठा नदीमध्ये 'ट्रॅश बूम' ही शाश्वत व प्रभावी यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे नदीत वाहून येणारा प्लास्टिक कचरा, निर्माल्य, फुले, नारळ तसेच इतर तरंगणारा कचरा अडवून त्याचे नियोजनबद्ध संकलन करता येते. 'ट्रॅश बूम' ही नदी स्वच्छतेसाठी दीर्घकालीन उपाययोजना असून, यामुळे नदीचे सौंदर्य आणि आरोग्य दोन्ही जपले जाईल. समीर पौलस्ते म्हणाले, मागील वर्षांमध्ये विविध संस्थांच्या सक्रिय सहभागामुळे नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात कोरडा कचरा संकलित करण्यात यश आले असून, नागरिकांमध्ये नदी संवर्धनाबाबत सकारात्मक बदल दिसून येत आहे. या उपक्रमामध्ये युवकांचा सहभाग वाढावा यासाठी नदी स्वच्छता मोहीम, रील्स स्पर्धा, सांस्कृतिक सादरीकरणे तसेच पर्यावरण जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण जपण्याचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तरी पुणेकरांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे.

## या व्हॅलेंटाईन डे निमित्त कलाकारांनी व्यक्त केलेल्या प्रेमाच्या भावना

पुणे (दै. संध्या) :



व्हॅलेंटाईन डे हा प्रामुख्याने रोमँसचा उत्सव मानला जातो, पण प्रेम अनेक साध्या आणि टिकाऊ रूपांतही अस्तित्वात असते. ते दैनंदिन क्षणांत, अर्थपूर्ण नात्यांत आणि शांत भावनांत सापडते—ज्या जीवनात आधार, संतुलन आणि ऊब आणतात. प्रेम बाहेरून व्यक्त होण्याआधीच ते लहानशा गोष्टींमध्ये जाणवते आणि मनाशी घट्ट जोडलेले राहते. या व्हॅलेंटाईन डे निमित्त सोनी सब चे कलाकार सुम्बुल तौकीर खान, नितीन बाबू, अक्षया हिंदळकर, ऋषी सक्सेना आणि दीक्षा जोशी यांनी प्रेमाविषयी आपले विचार मांडले, जे आपल्याला आठवण करून देतात की प्रेम हे साध्या अनुभवांत आणि क्षणांतच सर्वाधिक अर्थपूर्ण असते.

सुम्बुल तौकीर खान, इत्ती सी खुशी मध्ये अन्विता ही भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले "माझ्यासाठी व्हॅलेंटाईन डे हा मोठ्या दिखाव्याचा किंवा फक्त रोमँटिक प्रेमाचा दिवस नाही, तर तो भावनिक प्रामाणिकपणाचा आणि खऱ्या अर्थाने समजून घेण्याचा दिवस आहे. प्रेम त्या लोकांत सापडते जे तुमच्या कठीण काळात तुमच्या सोबत उभे राहतात, तुमच्या छोट्या यशांचा आनंद साजरा करतात आणि तुम्हाला जसे आहात तसे स्वीकारतात.

मी शिकलो आहे की प्रेमाची सुरुवात स्वतःशी दयाळू राहण्यात आणि आपल्या प्रवासाला महत्त्व देण्यात होते. जेव्हा तुम्ही असे करता, तेव्हा प्रत्येक नातं—कुटुंब, मित्र किंवा जोडीदार—अधिक अर्थपूर्ण होते. या व्हॅलेंटाईन डे ला मी माझ्या सभोवतालच्या सर्व प्रकारच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा निर्णय घेतला आहे."

नितीन बाबू, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये चिराग पटेलची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले "प्रेम नेहमीच नाट्यमय किंवा परिपूर्ण असण्याची गरज नाही. कधी कधी ते फक्त कोणासाठी उपस्थित राहण्यात, निःपक्षपातीपणे ऐकण्यात आणि चढ-उतारांत एकमेकांना साथ देण्यात असते. माझ्या मते व्हॅलेंटाईन डे हा आपल्या जीवनाला अधिक चांगले बनवणाऱ्या लोकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची सुंदर आठवण आहे.

मग ते कुटुंब असो, मित्र असो किंवा कुणी खास व्यक्ती—प्रेम म्हणजे सातत्य, विश्वास आणि खरी काळजी. मला आनंद आहे की माझ्या सभोवती असे लोक आहेत जे मला जमिनीवर ठेवतात आणि मला खऱ्या प्रेमाचे स्वरूप दाखवतात."

ऋषी सक्सेना, इत्ती सी खुशी मध्ये संजयची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले "माझ्या मते प्रेम ही सर्वात शक्तिशाली भावना आहे—ती तुम्हाला संयम, सहानुभूती आणि संतुलन शिकवते. व्हॅलेंटाईन डे आपल्याला त्या भावनेचा उत्सव साजरा करण्याची संधी देतो, पण मला वाटते प्रेम दररोज व्यक्त केले पाहिजे, फक्त एका प्रसंगी नाही. खरं प्रेम म्हणजे एकत्र वाढणे, एकमेकांच्या स्वप्नांना साथ देणे आणि सामायिक शांततेत आराम शोधणे. तसेच स्वतःवर इतके प्रेम करणे की तुम्हाला तुमची किंमत कळावी. हेच मी खरोखर मानतो आणि जगण्याचा प्रयत्न करतो."

अक्षया हिंदळकर, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये राशी पटेलची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले "आपण अनेकदा प्रेमाला फक्त नात्यांपुरते मर्यादित करतो, पण प्रेम त्यापेक्षा खूप मोठे आहे. ते सहवास, परस्पर आदर आणि भावनिक प्रामाणिकपणाबद्दल आहे. माझ्यासाठी व्हॅलेंटाईन डे म्हणजे जीवनाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या सर्व लोकांचा उत्सव—मित्र जे कुटुंबासारखे वाटतात, कुटुंब जे तुमची सर्वात मोठी ताकद असते आणि क्षण जे कायम स्मरणात राहतात. प्रेमाला लेबलची गरज नाही; त्याला फक्त प्रामाणिकपणाची गरज आहे."

दीक्षा जोशी, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये दीप्तीची भूमिका साकारत असून, त्यांनी सांगितले "तुमच्या सभोवतीचे लोक व्हॅलेंटाईन डे साजरा करताना, छोट्या प्रयत्नांनी आणि साध्या गोष्टींनी एकमेकांच्या चेहऱ्यावर हास्य आणताना पाहणे खरोखरच हृदयस्पर्शी असते.

## युरोजेनिटल कर्करोगाचे वाढते प्रमाण रोखणे गरजेचे

पुणे (दै. संध्या) :

■ डॉ. संजय कुलकर्णी यांचे मत; जागतिक कर्करोग दिनानिमित्त युरोकूल हॉस्पिटलमध्ये संवाद

■ जनजागृती, वेळेवर निदान व योग्य उपचाराने कर्करोगावर मात शक्य: डॉ. संजय कुलकर्णी

मूत्रमार्गाशी संबंधित प्रोस्टेट, मूत्रपिंड, मूत्राशय व अंडकोषाचा कर्करोग यांसारख्या युरोजेनिटल कर्करोगाचे प्रमाण देशभरात झपाट्याने वाढत असून, ही बाब गंभीर आणि चिंताजनक आहे. मात्र, योग्यवेळी निदान झाले, तर आधुनिक वैद्यकीय उपचारांच्या मदतीने या कर्करोगावर प्रभावीपणे नियंत्रण मिळवणे शक्य आहे. यासाठी व्यापक जनजागृती, नियमित आरोग्य तपासण्या आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक असल्याचे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युरोलॉजिस्ट व युरोकूल हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले.जागतिक कर्करोग दिनाच्या औचित्याने बाणेर येथील युरोकूल हॉस्पिटलमध्ये आयोजित माध्यम संवादावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते. प्रसंगी भारतातील पहिल्या महिला लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, रोबोटिक सर्जन डॉ. अमित होसरमनी, युरोऑन्को सर्जन डॉ. रोहित देशपांडे व डॉ. उदय चंदनखेडे, बाणेर-बालेवाडी मेडिकोज असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश देशपांडे, युरोकुलचे प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रमोद भावे आदी उपस्थित होते. डॉ. कुलकर्णी म्हणाले, "प्रोस्टेट कर्करोगामध्ये लघवी करताना अडथळा, वारंवार लघवी, तर मूत्राशयाच्या कर्करोगात लघवीत रक्त जाणे ही प्रमुख लक्षणे असतात. मात्र, अनेकदा सुरुवातीला ही लक्षणे स्पष्ट दिसून येत नाहीत. त्यामुळे वयाच्या पन्नाशीनंतर नियमित तपासण्या कराव्यात. जीवनशैलीतील बदल, धूम्रपान, तंबाखूचे सेवन, लठ्ठपणा, शारीरिक हालचालींचा अभाव हे कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणामागील प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे दुखणे अंगावर काढण्याची मानसिकता टाळून वेळेवर डॉक्टरांकडे जावे.

# सनातन प्रीमियर लीग : देशातील पहिली सांस्कृतिक क्रिकेट लीग

**SPL सीझन-१: मुंबईत १२ आणि १३ फेब्रुवारीला होणार ट्रायल, चाचा नेहरू पार्कमध्ये तरुण खेळाडूंना मिळेल व्यासपीठ**

पुणे (दै. संध्या) :

क्रिकेट, संस्कृती आणि जीवन मूल्यांच्या अनोख्या संयोजनासह सनातन प्रीमियर लीग (SPL) चा पहिला सीझन मार्च २०२६ मध्ये आयोजित केला जाईल. याच क्रमात आता मुंबईत १२ आणि १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मोफत ट्रायल आयोजित केले जातील.

हे ट्रायल चाचा नेहरू पार्क, वर्सोवा मेट्रो स्टेशनजवळ, मुंबई येथे होणार असून, मोठ्या संख्येने तरुण खेळाडू येऊन आपली प्रतिभा दाखवतील. SPL चे संस्थापक विजय शर्मा आहेत, तर सह-संस्थापक देव जोशी आणि आनंद मिश्रा आहेत. लीगचे आयोजन सनातन क्रिकेट क्लबद्वारे केले जात आहे. लीगचा उद्देश असा तरुणांपर्यंत पोहोचणे आहे, जे क्रिकेटशी जोडलेले असतात, पण कधी कधी जीवन मूल्ये आणि सामाजिक दिशेने भटकतात.

आयोजकांचे मत आहे की खेळाला योग्य मार्गदर्शन आणि उद्देश मिळाला, तर तो समाजात सकारात्मक बदलाचे प्रभावी माध्यम ठरू शकतो. SPL चे ट्रायल देशातील प्रमुख शहरांमध्ये आयोजित केले जात आहेत. यात १५ ते ४० वर्ष वयोगटातील खेळाडू सहभागी होऊ शकतात. निवड झालेल्या खेळाडूंसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातील.

त्यानंतर ते १२ ते १५ मार्च दरम्यान इंदौर येथे होणाऱ्या मुख्य टूर्नामेंटमध्ये भाग घेतील. लीगचा उद्देश जमिनीवरच्या प्रतिभांना राष्ट्रीय व्यासपीठ देणे आहे. सामन्यांचे प्रसारण प्रमुख स्पोर्ट्स चॅनेल्स आणि OTT प्लॅटफॉर्मवर केले जाईल. लीगला अनेक संत आणि आध्यात्मिक गुरूंचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभला आहे.

यात जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वती जी महाराज, पूज्य देवकीनंदन ठाकुर जी महाराज, पूज्य पंडित श्री प्रदीप मिश्रा जी, पूज्य चिन्मयानंद बापू जी महाराज, पूज्य श्री इंद्रेश उपाध्याय जी महाराज आणि पूज्य श्री अनिरुद्धाचार्य जी महाराज यांचा समावेश आहे. आयोजकांचे म्हणणे आहे की ही फक्त खेळाची स्पर्धा नाही, तर शिस्त, मूल्ये आणि सांस्कृतिक जागरूकतेशी जोडलेली मोहीम आहे. मुंबई ट्रायलदरम्यान निवडकर्ते शत्रुघ्न तिवारी, राहुल राणा, दुष्यंत त्यागी आणि अभिषेक गोला हे उपस्थित राहतील.प्रसिद्ध कथावाचक आणि सनातन धर्म प्रचारक पूज्य देवकीनंदन ठाकुर जी महाराज म्हणाले,"सनातन क्रिकेट लीगचे आयोजन सामाजिक कल्याण आणि सनातन मूल्यांच्या



प्रसारासाठी केले जात आहे. याचा मुख्य उद्देश खेळाच्या माध्यमातून तरुणांमध्ये शिस्त, देशभक्ती, सेवा आणि सांस्कृतिक संस्कार विकसित करणे आहे. ही लीग त्या प्रतिभावान मुलांना मोफत संधी देते, ज्यांच्याकडे योग्य व्यासपीठ आणि साधने नसतात. आजच्या काळात जेव्हा तरुण तणाव आणि नैतिक पतनासारख्या आव्हानांमधून जात आहेत, असे प्रयत्न त्यांना नवीन ऊर्जा, आत्मविश्वास आणि दिशा देतात. खेळाबरोबरच ही फक्त स्पर्धा नाही, तर टीमवर्क, सकारात्मक विचार आणि संघर्षक्षमता वाढवते. तसेच लीगमधून मिळालेल्या रकमेचा वापर मुलींच्या शिक्षण, विवाह आणि उपेक्षित मुलींच्या सुरक्षेसारख्या सामाजिक कार्यासाठी केला जाईल. "SPL मध्ये विजेते संघाला ३१ लाख रुपये आणि उपविजेते संघाला १५ लाख रुपये दिले जातील. याशिवाय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना कार, बाइक आणि रोख रक्कमेचे बक्षिसेही दिली जातील, ज्यामुळे ही देशातील सर्वात आकर्षक ग्रासरूट क्रिकेट उपक्रमांपैकी एक ठरते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### काम करत आलेय काम करतच राहीन - विद्याताई मोहिते

चाकण (दैनिक संध्या) : काम करत आलेय काम करत राहीन, ह्या युक्ती प्रमाणे गेल्या अनेक वर्षापासून मी मनापासून झपाटल्यासारखे गोरगरीब जनतेची पडेल ती कामे आणि सेवा करत आहे, असे खेड पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्या विद्याताई सयाजीराजे मोहिते पाटील यांनी सांगितले. विद्याताई यांनी सांगितले की," मी न थांबता न थकता दुसरा कोणाचा निधी न घेता काम करत आहे. आणि त्यापासून मला काही फायदा व्हावा, असे काहीही नाही. फक्त गोरगरिबांची सेवा, गरजुंना मदत एवढेच ध्येय डोळ्यासमोर ठेऊन काम करत आलेय. त्यामुळे या निवडणुकीत माझ्या हाताला अजुन जोड मिळावी यासाठी मी राजकारणातून थोडे फार सहकार्य मिळवून फक्त समाजाची सेवा करण्यासाठी पुढाकार घेत आहे. लोक म्हणतात उमेदवार फक्त इलेक्शन पुरते येतील. आणि परत पाच वर्ष यायचे पण नाही. पण तुम्ही जनतेतून बाहेर न गेलेली तुमची जनसेविका निवडली आहे. की जे मागील काही वर्ष झपाटल्यासारखे जनतेची पडेल ती कामे करतेय. कुठलाही स्वार्थ न ठेवता बस्स. आपण जनतेचे काहीतरी देणे लागतो. या युक्तिप्रमाने म्हणुनच मायबाप जनतेला हिच विनंती करते की, मी काम करत राहणार आहे. मी तुमचे मतदान वाया जाऊन देणार नाही. कोणाच्याही विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. शेलपिंपळगाव गणाचा विकास हाच माझा ध्यास राहील.



### पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची वैचारिकता वाखाणण्याजोगी - ॲड. प्रीतम शिंदे

चाकण (दैनिक संध्या) : जनसंघ आणि भाजपसाठी स्व.डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे राजकीय विचारांचे तज्ञ होते, तर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची संघटनात्मक बांधणी आणि वैचारिकता वाखाणण्याजोगी होती, असे विचार भाजपा सेवा आघाडीचे जिल्हा संयोजक ॲड. प्रीतम शिंदे यांनी व्यक्त केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अखंड मानवता वादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना समाजात मांडली. उपाध्याय यांच्या पुण्यतिथीचे स्मरण करून चाकण येथे भाजपच्या वतीने समर्पण दिवस साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ॲड. शिंदे बोलत होते. याप्रसंगी भारतीय जनता पार्टी खेड तालुका अध्यक्ष भगवान मेदनकर, जिल्हा सरचिटणीस प्रिया पवार, चाकण मंडल सरचिटणीस अजय जगनाडे, संदेश जाधव, चाकण मंडल उपाध्यक्ष बाळासाहेब भोपे, भाजपा सहकार आघाडी खेड तालुकाध्यक्ष अनिल सोनवणे, सेवा आघाडी जिल्हा संयोजक प्रितम शिंदे, युवा मोर्चा चाकण मंडल अध्यक्ष धीरज वाळुंज, युवा मोर्चा सरचिटणीस नसीम पठाण, वाहतूक आघाडी चाकण मंडल अध्यक्ष योगेश देशमुख, अल्पसंख्यांक मोर्चा चाकण मंडल अध्यक्ष शार्दुल पठाण, दक्षिण भारतीय आघाडी चाकण मंडल अध्यक्ष गणपती गौडा पाटील, वाहतूक आघाडी उपाध्यक्ष संतोष ओतारी, समीर शेख आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कार्याचा गौरव करून प्रीतम शिंदे म्हणाले," नुसत्या जयंत्या, समर्पण दिवस अथवा पुण्यतिथी साजरी करून चालणार नाही. तर उपाध्यक्ष यांची व्यासंगी परंपरा व स्मृती जतन करण्यासाठी लोकोपयोगी उपक्रम राबवणे गरजेचे आहे. अशा सामाजिक उपक्रमांतूनच भाकरीचा चंद्र शोधणाऱ्या नागरिकांना अखंडपणे दिलासा मिळण्यास मदत होईल. जोपर्यंत विश्वाला गती आहे तोपर्यंत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन कार्याची फुलबाग निश्चितपणे टवटवीत राहणार आहे." यावेळी वरील मान्यवरांनी उपाध्याय यांच्या कार्याचा गौरव केला. प्रिया पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

# इंटरसिटी स्मार्टबसकडून पुणे-नागपूर मार्गावर बससेवा सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

- पुणे-नागपूर मार्गावर भारतातील पहिली प्युरीफाईड एअर बससेवा
- स्मार्टबस.एक्यूआयकडून लांब पल्ल्याच्या आंतरशहर प्रवासासाठी सतत हवा शुद्धीकरण आणि रिअल-टाइम एक्यूआय मॉनिटरिंग सादर




भारतातील आघाडीच्या इंटरसिटी मोबिलिटी ब्रँड असलेल्या इंटरसिटी स्मार्टबसने आज पुणे-नागपूर आणि नागपूर-पुणे मार्गांवर इंटरसिटी स्मार्टबस.एक्यूआय सुरू (IntrCity SmartBus. AQI) करण्याची घोषणा केली. त्यामुळे या प्रदेशातील प्रवाशांसाठी भारतातील पहिली शुद्ध हवा देणारी बससेवा उपलब्ध झाली आहे.

पुणे-नागपूर मार्गावरील स्मार्टबस.एक्यूआय सेवेला पुण्यात औपचारिकरित्या आरटीओ पुणे येथील मोटार वाहन निरीक्षक. श्रीपाद भागवत यांच्या सन्माननीय उपस्थितीत झेंडा दाखवण्यात आला. त्यावेळी इंटरसिटी स्मार्टबस चे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व मान्यवर ही यावेळी उपस्थित होते. दोन शहरांमधील बस प्रवासात आरोग्य, सुरक्षितता आणि आरामदायी दर्जा वाढवण्याच्या कंपनीच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा हा सोहळा इंटरसिटीच्या स्वच्छ-हवेचा प्रवास उपक्रमातील मैलाचा दगड ठरला आहे.

इंटरसिटी स्मार्टबसचे सह-संस्थापक आणि सीईओ मनीष राठी म्हणाले, "पुणे हे आंतरशहर प्रवासाचे एक महत्त्वाचे केंद्र असून पुणे - नागपूरसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांना येथे मोठी मागणी आहे. स्मार्टबस.एक्यूआयच्या माध्यमातून आम्ही बसमधील हवेची गुणवत्ता या प्रवासाच्या एका दुर्लक्षित पैलूवर लक्ष केंद्रित करत आहोत. प्रवाशांना श्वासावाटे स्वच्छ, सुरक्षित हवा घेताना लांब अंतराचा प्रवास करता येईल याची सुनिश्चिती करणे, हे आमचे ध्येय आहे."

दोन शहरांदरम्यान प्रवासाच्या मार्गांवर केबिनमधील वायू प्रदूषण जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) केलेल्या मर्यादेपेक्षा २ ते ३ पट जास्त असू शकते, असे इंटरसिटीने केलेल्या अंतर्गत पाहणीत आढळून आले आहे. यावर मार्ग काढण्यासाठी कंपनीने स्मार्टबस.एक्यूआयला सतत हवा शुद्धीकरण आणि देखरेख प्रणालींनी सुसज्ज करण्यासाठी रिस्पायरर लिव्हिंग सायन्सेस या पुरस्कारविजेत्या हवामान तंत्रज्ञान कंपनीशी भागीदारी केली आहे.

या अंतर्गत पायलट प्रयोगात प्रवासाच्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त काळ पीएम २.५ ची पातळी सुमारे ४० $\mu g/m^3$ वर राखण्यात आली. प्रमुख भारतीय शहरांमध्ये असलेल्या बाहेरील हवेच्या सामान्य पातळीपेक्षा ही लक्षणीयरीत्या स्वच्छ पातळी आहे.

पुणे-नागपूर कॉरिडॉरवरून प्रवास करणारे प्रवासी बुकिंगच्या वेळी इंटरसिटी ॲप किंवा वेबसाइटवरील "इंटरसिटी स्मार्टबस.एक्यूआय" टॅगद्वारे या बसेस सहजपणे ओळखू शकतील. हा टॅग प्रगत ऑनबोर्ड एअर-क्वालिटीकंट्रोल प्रणालीचा निर्देश करतो. प्रवासादरम्यान प्रवाशांना रिअल-टाइम एक्यूआय आणि

पीएम २.५ पातळीसुद्धा पाहता येईल. ती ऑनबोर्ड आणि ॲपमध्ये प्रदर्शित केले जाईल, त्यामुळे संपूर्ण पारदर्शकतेची हमी मिळेल.

पुणे-नागपूर मार्गावरील ही सुरूवात आत्यंतिक प्रदूषण असलेल्या उत्तर भारतातील मार्गांवर इंटरसिटीने लागू केलेल्या स्मार्टबस.एक्यूआयच्या आधीच्या रोलआउटवर आधारित आहे. त्यानंतरच्या टप्प्यात आणखी कॉरिडॉर जोडले जाणार आहेत. इंट्रसिटीने सातत्याने ऑनबोर्ड वॉशरूम, बोर्डिंग लाउंज,

डिजिटल चेक-इन आणि प्रशिक्षित बस कॅप्टन यांसारख्या श्रेणीतील प्रथमपणाचा मान असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची ओळख करून दिली आहे. स्मार्टबस.एक्यूआयच्या माध्यमातून कंपनीने या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा स्वच्छ-हवेच्या प्रवासापर्यंत विस्तार केला आहे.

इंटरसिटीने एक समर्पित स्मार्टबस.एक्यूआय मायक्रोसाईटसुद्धा https://www.intrcity.com/smartbus-aqi देखील सादर केली आहे.

तिथे प्रवासी या तंत्रज्ञानाचा मागोवा घेऊ शकतात, हवा शुद्धीकरण कसे कार्य करते हे समजून घेऊ शकतात आणि या स्वच्छ-हवा उपक्रमाबद्दल अधिक जाणून घेऊ शकतात.

# थायरॉइड आय डिसीजमुळे येणारे कायमस्वरूपी अंधत्व टळले

**पुणे (दै. संध्या) :**

- आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया
- कायमस्वरूपी अंधत्वापासून रुग्णाला वाचवले

पुण्यातील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल (एबीएमएच) येथील डॉक्टरांनी गंभीर अवस्थेतील थायरॉइड आय डिसीज (टीईडी) ने ग्रस्त असलेल्या ५४ वर्षीय रुग्णाच्या डोळ्यावर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया केल्याने त्याची दृष्टी परतली. येथील डॉक्टरांनी गुंतागुंतीचा आजार असलेल्या या रुग्णाच्या डोळ्यावर अल्प-आक्रमक ऑप्टिक नर्व डीकंप्रेशन ही उच्च-जोखम असलेली शस्त्रक्रिया केली. कान – नाक घसा तज्ञ व एंडोस्कोपिक सर्जन डॉ. शालिनी सक्सेना यांच्या नेतृत्वाखाली, डॉ नेत्ररोग विभागाचे सहयोगी संचालक डॉ. रितेश ककरानिया आणि न्यूरोसायन्सेस विभागाचे वरिष्ठ संचालक व स्कल बेस सर्जन डॉ. राकेश रंजन यांच्या समन्वयाने ही शस्त्रक्रिया पार पडली. मुळचा झारखंड येथील ५४ वर्षीय रुग्णाला हायपरथायरॉइडिझम आणि मधुमेहाचा इतिहास होता. अनेक महिन्यांपासून त्याला दोन्ही डोळे सूजणे, डोळ्यांची हालचाल मर्यादित होणे, दोन प्रतिमा दिसणे आणि दृष्टी झपाट्याने कमी होणे अशी लक्षणे जाणवत होती. तो आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी येईपर्यंत त्याच्या डाव्या डोळ्याची दृष्टी पूर्णपणे गेली होती आणि उजव्या डोळ्याची दृष्टीही गमावण्याचा गंभीर धोका निर्माण झाला होता.

त्याच्या थायरॉइड तपासणीत अहवालांमध्ये हार्मोनची पातळी गंभीरपणे अनियंत्रित असल्याचे दिसून आले. त्यांचे टीएसएच पातळी ०.०१ पेक्षा कमी (सामान्य श्रेणी ०.५ –५.०), टी ३ पातळी वाढलेली आणि टी ४ पातळी लक्षणीयरीत्या जास्त होती.

अतिरिक्त थायरॉइड हार्मोन्समुळे डोळ्यांच्या मागे सूज आणि दाह निर्माण झाला होता, ज्यामुळे दृष्टीच्या ऑप्टिक नर्व (डोळ्यांमधून मेंदूपर्यंत पाहिलेली माहिती पोहोचवणारी मुख्य नस) वर दबाव येत होता. ही अवस्था थायरॉइड आय डिसीज म्हणून ओळखली जाते आणि वेळेत उपचार न केल्यास कायमस्वरूपी अंधत्व येऊ शकते. एमआरआय तपासणीत ऑप्टिक नर्ववर लक्षणीय दाब असल्याचे दिसून आले. रुग्णाची हायपरथायरॉइड स्थिती अनियंत्रित असल्यामुळे, शस्त्रक्रिये दरम्यान थायरॉइड स्टॉर्मसारख्या गुंतागुंतींचा धोका वाढतो.

## पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु, भोपाळ आणि रांची येथील कॅम्पसमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असणाऱ्यांना २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्र, विकासशास्त्र, पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन), अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य आणि हवामान बदल व शाश्वतता या विषयांत पदव्युत्तर पदवी घेता येईल. कॅम्पसनुसार हे अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी तयार केले गेले आहेत, ज्यांना भक्कम शैक्षणिक पाया रचण्याबरोबरच समकालीन सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांचा सखोल अभ्यास करायचा आहे. विद्यापीठाच्या बंगळूरु कॅम्पसमध्ये

Azim Premji University

एम.ए. अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र (डेव्हलपमेंट) एम. ए. शिक्षणशास्त्र (एज्युकेशन), एम. ए. पूर्व प्राथमिक शिक्षणशास्त्र, एम. एस्सी. हवामान बदल व शाश्वतता; भोपाळ कॅम्पसमध्ये एम. ए. विकासशास्त्र, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच); तर रांची कॅम्पसमध्ये एम. ए. उपयोजित अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येणार आहे. सर्व कॅम्पसमधील हे पदव्युत्तर अभ्यासक्रम आंतरशाखीय शिक्षण, तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे अध्यापन आणि वास्तव जगातील परिस्थितींशी सतत जोडलेले राहण्यावर भर देतात. विद्यार्थी वर्गातील अभ्यासाबरोबर प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव आणि प्रकल्पांच्या माध्यमातून शिक्षण घेतात.

# चोरीला आळा घालण्यासाठी एअरटेलची नवी यंत्रणा कार्यान्वित

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ग्राहकांना सायबर भामट्यांपासून सुरक्षित ठेवणार




स्पॅम आणि ऑनलाइन फसवणूकीच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी एअरटेलने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून 'फ्रॉड अलर्ट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी अत्याधुनिक सुविधा सुरु केली आहे. 'फ्रॉड अलर्ट' ही नाविन्यपूर्ण प्रणाली ग्राहकांच्या वन-टाइम पासवर्ड संबंधित बँक फसवणूकींपासून तत्काळ प्रभावीपणे संरक्षण देते. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने संशयास्पद व्यवहार ओळखते. फसवणूकीचे व्यवहार होण्याची शक्यता असल्यास ही प्रणाली तत्काळ ग्राहकांना संबंधित व्यवहाराबद्दल सूचित करते. त्यामुळे एअरटेलचे ग्राहक ऑनलाइन फसवणूकीच्या व्यवहारातून पूर्णपणे सुरक्षित झाले आहे.

घरात ऑनलाईन ऑर्डरच्या माध्यमातून येणारे पार्सल किंवा अन्नपदार्थांचे वितरण होण्याकरिता ग्राहकांच्या मोबाईलनंबरवर येणा-या ओटीपीची मागणी केली जाते. घरपोच होणारे वितरण स्विकारताना अनेकांची लगबग सुरु असते. सायबर भामटे लोकांची होणारी धावपळ लक्षात घेत त्याचा गैरफायदा घेतात. अनेकदा वस्तू वितरण करण्याच्या बहाण्याने किंवा तातडीची सेवा देण्याच्या नावाखाली हे सायबर भामटे ग्राहकांकडून ओटीपीची मागणी करतात. कामाच्या व्यापात अडकलेल्या ग्राहकाला संबंधित ओटीपी हा बँकेऐवजी वितरणसेवेशी संबंधित असल्याचा गैरसमज होतो. प्रत्यक्षात हा ओटीपी ग्राहकांच्या बँकेतील व्यवहारांशी संबंधित गोपनीय ओटीपी असण्याची शक्यता असते. ग्राहकांकडून अनावधानाने दिलेला ओटीपी सायबर भामटे ऑनलाइन चोरीकरिता वापरुन ग्राहकांना लुबाडतात. एअरटेलची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी यंत्रणा अशा संभाव्य धोक्यांना वेळीच ओळखते. ग्राहकांना तातडीने सावध करते. मोबाईलवर एखाद्या संशयास्पद कॉलदरम्यान बँकेचा ओटीपी संदेश आल्यास ही यंत्रणा सतर्क होते. मोबाईलवर आलेल्या संदेशातून फसवणूक होत असल्याचे ग्राहकांच्या निदर्शनास आणून देते. फ्रॉड अलर्ट ही यंत्रणा ग्राहकांचा कॉल सुरु असला तरीही बँक व्यवहारासाठी ओटीपी स्विकारण्याचा धोका लक्षात आणून देण्यास मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी निर्णयक्षमता यांचा हा प्रभावी मेळ ग्राहकांना विचार करण्यासाठी, संबंधित फसवणूकीच्या घटनेची खातरजमा करण्यासाठी, स्वतःहूनच आपापली सुरक्षितता करण्यासाठी गरजेयुक्त वेळ उपलब्ध करुन देतो. परिणामी, ग्राहक ऑनलाइन चोरींच्या घटनांपासून सुरक्षित राहतात. एअरटेलच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीबाबत एअरटेल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शाश्वत शर्मा यांनी आपले मत मांडले.

# संगमेश्वरमध्ये 'निकम' ब्रँडची जादू

## धामापूर गटात सुशिल भायजे, तर आरवली गणात प्रिया सुवरे विजयी

**संगमेश्वर (दै. संध्या) :**

- आमदार शेखर निकम यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब; विजय अजितदादांना समर्पित



रत्नागिरी जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या संगमेश्वर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये धामापूर तर्फे संगमेश्वर जिल्हा परिषद गटातून सुशिल बबन भायजे आणि आरवली पंचायत समिती गणातून प्रिया सुवरे यांनी दणदणीत विजय मिळवून विरोधकांचे आव्हान मोडीत काढले आहे.

निवडणुकीच्या निकालात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी सुरुवातीपासूनच आघाडी कायम ठेवली होती. सुशिल बबन भायजे यांनी ३,१०६ मतांचे प्रचंड मताधिक्य (लीड) घेत विजय मिळवला तर प्रिया सुवरे यांनी १,२१३ मतांच्या फरकाने प्रतिस्पर्ध्याला पराभूत केले.

या विजयाचे मुख्य शिल्पकार म्हणून आमदार शेखर निकम यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांच्या नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे आणि जनसंपर्कामुळे दोन्ही उमेदवारांना मतदारांनी पसंती दिली. विजयानंतर बोलताना आमदार निकम यांनी हा विजय पक्ष कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आणि विकासाच्या राजकारणाचा असल्याचा विश्वास व्यक्त केला.

आमदार शेखर निकम यांनी या विजयाचा आनंद व्यक्त करताना हा विजय अजितदादा पवार यांना समर्पित केला. विजयी उमेदवारांचे अभिनंदन करतानाच, मतदारसंघाच्या विकासासाठी आपण कटीबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

निकाल जाहीर होताच संगमेश्वर आणि आरवली परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत मोठा जल्लोष केला. "हा विजय आमचा नसून आमदार शेखर निकम यांनी केलेल्या विकासकामांचा आणि जनतेचा आहे," अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सुशील भायजे यांनी विजयानंतर दिली. फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाच्या उधळणीत नवनिर्वाचित प्रतिनिधींची मिरवणूक काढण्यात आली.

या विजयामुळे आगामी काळात संगमेश्वर तालुक्यातील विकासकामांना अधिक गती मिळणार असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई - निविदा सूचना

अधीक्षक अभियंता, महावितरण रास्तापेठ शहर मंडल कार्यालयातर्फे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांना रास्तापेठ शहर मंडल कार्यक्षेत्रातील वितरण रोहित्रांची दुरुस्ती कामे करण्यासाठी नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करण्याकरिता ई-निविदा मागवण्यात येत आहेत.

| क्रं. | निविदा क्रं. | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | SE/RPUC/T-10/ 2025-26 | रास्तापेठ मंडलातील **100 KVA हून अधिक** क्षमतेच्या वितरण रोहित्रांची दुरुस्ती करण्यासाठी कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त एजन्सीला नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणे |
| 2 | SE/RPUC/T-11/ 2025-26 | रास्तापेठ मंडलातील **100 KVA पेक्षा कमी** क्षमतेच्या वितरण रोहित्रांची दुरुस्ती करण्यासाठी कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त एजन्सीला नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणे |
| 3 | SE/RPUC/T-12/ 2025-26 | रास्तापेठ मंडलातील **100 KVA हून अधिक** क्षमतेच्या वितरण रोहित्रांची दुरुस्ती करण्यासाठी नव्याने नोंदणीकृत झालेल्या मान्यताप्राप्त एजन्सीला नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणे |
| 4 | SE/RPUC/T-13/ 2025-26 | रास्तापेठ मंडलातील **100 KVA पेक्षा कमी** क्षमतेच्या वितरण रोहित्रांची दुरुस्ती करण्यासाठी नव्याने नोंदणीकृत झालेल्या मान्यताप्राप्त एजन्सीला नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणे |

वरील निविदा महावितरण कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा विक्रीसाठी **दि. 12.02.2026 ते दि. 25.02.2026 पर्यंत** उपलब्ध राहतील. निविदेमधील बदल, मुदतवाढ आदी महावितरणच्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल. अधिक माहितीसाठी **संपर्क:** 7875767015

**अधीक्षक अभियंता,**
**रास्तापेठ शहर मंडल, पुणे**

PRO/PZ/232/2025-26

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई - निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, भोसरी विभागाअंतर्गत नविन वीज जोडणी कामासाठी एक वर्षाच्या करारासाठी स्थानिक परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी ई-निविदा महावितरण कंपनीच्या **http://works.mahadiscom.in/eTender/etender** संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

| Tender No. | Particular | Sale period |
|---|---|---|
| EE/BSR/T-29/2025-2026 | NSC | 11.02.2026 to 18.02.2026 |

निविदेच्या आवृत्तीत/शुध्दीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता महावितरण,**
**भोसरी विभाग**

PRO No-PZ/229/2025-26

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे वारूळवाडी ता. जुन्नर जि. पुणे परिसरातील लोकांस सदरच्या नोटिसीने जाहीरपणे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ह्या मंगल विलास भुजबळ रा. वारुळवाडी (नारायणगाव) ता. जुन्नर, जि. पुणे यांच्या मालकीची, वहिवाटीची अशी मिळकत आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केले आहे, त्याबाबत आमचे अशिलांबरोबर विक्री विषयाची बोलणी झालेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याबाबत खात्री व भरवसा सदरील मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या सदरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदी-विक्री, लीज-लिन, चोळीबांगडी, पोटगी, साठेखत, खरेदीखत, इ. स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी असून सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन तु. पुणे, पो. तु.जुन्नर, ता.जुन्नर जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर महसुली गाव व ग्रा. पं. वारूळवाडी हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक सो. नारायणगाव यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत -

मौजे वारूळवाडी येथील गट क्र. **१००/१ (खाते क्र. ३९७०)** वरील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे :

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| १००/१ | खाते नं. ३९७० वरील एकूण क्षेत्र ०० हे ६० आर मंगल विलास भुजबळ यांचे मालकी ताबे वहिवाटीचे कायदेशिर मालकीचे संपूर्ण क्षेत्र | ०.८२ |

यासी चतुःर्सिमा खालीलप्रमाणे:-

| पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|
| जुना पुना नाशिक हायवे | अंतर्गत १५ फुटी रस्ता | गट क्र. १००/१ पैकी मंगल भुजबळ यांचे क्षेत्र | गट क्र. १००/१ पैकी मंगलराव व संजय महादेव डेरे यांचे क्षेत्र |

येणेप्रमाणे वर्णनाची चतुःर्सिमापूर्वक मिळकत त्यामधील दगड, माती, तदंगभूत वस्तू, वहिवाटीचे व जाणे येणेचे हक्कासह इजमेंटरी मिळकत.

**येणेप्रमाणे जाहीर नोटीस.**
**नारायणगाव**
**तारीख - ११/०२/२०२६**

**सही/-**
**श्री. सचिन बाबाजी निकम**
**ॲडव्होकेट**
**नारायणगाव, ता. जुन्नर जि. पुणे**
**मो. ९९६०६६३२६६**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चिंचवडमध्ये तरुणावर प्राणघातक हल्ला; सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

चिंचवड (दैनिक संध्या) : जुन्या वादातून चिंचवड येथे एका २२ वर्षीय तरुणावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सात जणांविरुद्ध चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० फेब्रुवारी रोजी दुपारी केशवनगर, मराठी शाळेसमोर ही घटना घडली. फिर्यादी आशीष संतोष वराडे (वय २२, रा. चिंचवड) हे त्या ठिकाणी जात असताना आरोपींनी त्यांना अडवले. जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपींनी दहशत पसरवण्याच्या उद्देशाने कोयता व लोखंडी रॉडने वार करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस जबरदस्तीने स्विफ्ट कार मध्ये बसवून चिंचवड येथील गावडे जलतरण तलाव परिसरात नेले. तेथेही त्यांच्यावर कोयता व लोखंडी काड्याने मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या हल्ल्यात फिर्यादी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी विकी अनिल घोलप (वय ३१, रा. शिरगाव परंदवाडी मावळ), मयूर अनिल घोलप (वय ३३ रा. शिरगाव परंदवाडी मावळ), शुभम विनायक चौधरी वय २९, रा. गावडे भोईर आळी चिंचवडगाव), आदित्य अशोक चव्हाण (वय २९, रा. भीम नगर चिंचवड गाव), मंगेश नंदकुमार सांगळे (वय २७, रा. काकडे पार्क चिंचवड), प्रसाद उर्फ सोन्या मारुती साबळे (वय २३ रा. मोरे वस्ती चिखली), समीर कोंडीराम भोईर (रा. चिंचवड) या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.




### पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक शाखेकडून 'एक दिवस शाळेसाठी' उपक्रम

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'एक दिवस शाळेसाठी' या जनजागृती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नुकतेच २६ व्या टप्प्यात शहरातील १४ शाळांमध्ये जाऊन सुमारे २३६५ विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा व वाहतूक नियमांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन, अपघात प्रतिबंधक उपाययोजना, हेल्मेट व सीटबेल्ट वापराचे महत्त्व, अल्पवयीन वाहनचालना टाळणे, तसेच सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करून जबाबदार नागरिक घडविण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. 'एक दिवस शाळेसाठी' या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत २६ टप्प्यांमध्ये ४३२ शाळांमध्ये जाऊन तब्बल १,०२,९११ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून, शाळा प्रशासन व पालकांकडूनही उपक्रमाचे कौतुक होत आहे. पोलिस आयुक्त विनायक चौबे, अपर पोलिस आयुक्त शशिकांत महावकर, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त (वाहतूक) विवेक पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आगामी काळातही शहरातील विविध शाळांमध्ये अशाच प्रकारे जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक शाखेकडून देण्यात आली आहे.

### निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथे तीन लक्झरी बस जळून खाक

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील निगु ट्रान्सपोर्ट नगर परिसरात भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. ट्रान्सपोर्ट नगर येथील परिसरात असलेल्या लक्झरी बस पार्किंगमध्ये अचानक आग लागल्याने तीन लक्झरी बसेस पूर्णपणे जळून खाक झाल्या आहेत. ही धक्कादायक घटना रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. बसला आग कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही.

### 'हायमास्ट लाईट'चा पाया खचला; तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला..!



पिंपरी (दैनिक संध्या) : वाकड येथील कस्तुरी चौक परिसरात द्रोपदा लॉन्स समोरील 'हायमास्ट लाईट'चा पाया खचल्याची गंभीर बाब भाजपाच्या नगरसेविका सौ. श्रुती राम वाकडकर यांना पाहणी दरम्यान निदर्शनास आली. संभाव्य धोका लक्षात घेता त्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या वेळेवर घेतलेल्या निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला आहे. प्रभागातील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करताना ही बाब नगरसेविका श्रुती वाकडकर यांच्या द्रोपदा लॉन्स समोरील 'हायमास्ट लाईट'चा पाया खचल्याची गंभीर बाब लक्षात आली. त्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. याचवेळी अटलांटा-2 ते कस्तुरी चौक तसेच कस्तुरी चौक ते विनोदे कॉर्नर या मार्गावरील दोन्ही बाजूंचे फुटपाथ नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षित पादचारी वाहतुकीसाठी नव्याने विकसित करण्याचे निर्देशही नगरसेविका श्रुती वाकडकर यांनी दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, दर्जेदार व वेळेत विकासकामे पूर्ण करण्यावर भर दिला जाईल, असे सौ. श्रुती राम वाकडकर यांनी सांगितले. या पाहणीदरम्यान पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे उपाध्यक्ष राम वाकडकर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या सोयीसुविधा आणि सुरक्षित प्रवासासाठी कटिबद्ध असल्याचे नगरसेविका श्रुती वाकडकर यांनी म्हटले आहे.

# स्वच्छ प्रशासनासाठी महापौर रवी लांडगे ॲक्शन मोडवर

## एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची तातडीने बदलीचे आदेश



पिंपरी (दै. संध्या) : महापालिका आस्थापनेवरील एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करण्याचे आदेश नवनिर्वाचीत महापौर रवी लांडगे यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिले आहेत.

महापौर रवी लांडगे आपल्या आदेशात म्हणतात, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणणे हे आपले प्रमुख ध्येय आहे. मात्र, महापालिकेच्या आस्थापनेवरील अनेक अधिकारी आणि कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून अधिक काळ एकाच विभागात अथवा एकाच पदावर ठाण मांडून बसले आहेत.

स्थापत्य, पर्यावरण, नगररचना, बांधकाम परवाना, आरोग्य, वैद्यकीय, करसंकलन, भांडार आणि उद्यान यांसारख्या महत्वाच्या विभागांमध्ये कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लेखापाल, भांडारपाल व अन्य कर्मचाऱ्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत.

एकाच विभागात दीर्घकाळ राहिल्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांचे स्थानिक स्तरावर हितसंबंध निर्माण झाले आहेत.यामुळे प्रशासकीय कामांत 'अर्थपूर्ण वाटाघाटी' आणि भ्रष्टाचाराला वाव मिळत आहे. हे महापालिकेच्या प्रतिमेसाठी अत्यंत घातक आहे. अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाल्यानंतरही नियमानुसार त्यांची बदली दुसऱ्या विभागात होणे अपेक्षित होते. मात्र, विभागप्रमुखांच्या मर्जीतील असल्याने पदोन्नती मिळूनही ते त्याच जुन्या विभागात कार्यरत आहेत, असेही महापौर लांडगे यांनी स्पष्टपणे नमूद केले.

विभागप्रमुखांकडून आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना सोडण्यास होणारा विरोध आणि प्रशासनाचे या विषयाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडत असून पारदर्शकतेला हरताळ फासला जात आहे. यासाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने इतरत्र बदली करून प्रशासनात फेरबदल करण्यात यावेत. या विषयाचे गांभीर्य ओळखून आपण तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कारवाईचा अहवाल महापौर कार्यालयास सादर करावा, अशा सूचना महापौर रवी लांडगे यांनी दिल्या आहेत.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत लवकरच मेगाभरती

पिंपरी (दै. संध्या) :

**■ ४७१ पदांसाठी प्रक्रिया सुरू**

आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेचा विस्तार झपाट्याने होत असून लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या नागरी सुविधांच्या गरजेमुळे प्रशासनावर ताण वाढला असून तो कमी करण्यासाठी महापालिका लवकरच मेगाभरती प्रक्रिया राबवणार आहे. पहिल्या टप्प्यात ४७१ पदे भरण्याची तयारी सामान्य प्रशासन विभागाने सुरू केली आहे. महापालिकेचा 'ब' वर्गात समावेश झाल्यानंतर कामाची व्याप्ती वाढली आहे. त्यानुसार सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला असून पूर्वीच्या ११,५१३ पदांच्या तुलनेत आता एकूण १६,८३८ पदांचा नवा आराखडा निश्चित करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात ५,३२५ नव्या पदांची भरती केली जाणार आहे.

आगामी भरती प्रक्रियेत तांत्रिक, आरोग्य, सुरक्षा व स्वच्छता तसेच प्रशासन विभागातील रिक्त पदांना प्राधान्य दिले जाणार आहे. तांत्रिक विभागात कनिष्ठ अभियंता व इतर अभियांत्रिकी कर्मचारी, आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट, एएनएम, आरोग्य निरीक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक यांची भरती होणार आहे. तसेच सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी, माळी आणि लिपिक संवर्गातील मोठ्या प्रमाणातील रिक्त पदेही भरली जाणार आहेत. दरम्यान, महापालिकेने ऑगस्ट २०२३ मध्ये सुधारित आकृतिबंध राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला होता.

## एस.बी.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचा औद्योगिक दौरा




पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथील एमबीए प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी नुकताच हैदराबाद येथे औद्योगिक अभ्यास दौरा पूर्ण केला. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग विश्वातील प्रत्यक्ष कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापन कौशल्यांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

या औद्योगिक भेटीत विद्यार्थ्यांनी इस्रो, हैदराबाद, पारले - जी बिस्किट निर्मिती कारखाना, मस्कती मिल्क अँड क्रीम फॅक्टरी, टी-वर्क आणि झिंदा तिलिस्मत फॅक्टरी या नामांकित कंपन्यांना भेटी दिल्या.

इस्रो भेटीत विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन, उपग्रह निर्मिती प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण व प्रकल्प व्यवस्थापन याबाबत सखोल माहिती मिळाली. पारले - जी कारखान्यात स्वयंचलित बिस्किट उत्पादन, पुरवठा साखळी व्यवस्थापन, ब्रँडिंग व गुणवत्ता मानकांची माहिती देण्यात आली. मस्कती मिल्क अँड क्रीम फॅक्टरी मध्ये दुग्ध प्रक्रिया उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन नियोजन व स्वच्छता मानकांवर भर देण्यात आला. टी-वर्क्स येथे नव उद्योजकता, स्टार्टअप संस्कृती, प्रोटोटायपिंग व इनोव्हेशन इकोसिस्टम आणि झिंदा तिलिस्मत फॅक्टरीमध्ये पारंपरिक उत्पादन प्रक्रियेसोबत आधुनिक विपणन धोरणांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांचे सैद्धांतिक ज्ञान हे प्रत्यक्ष अनुभवाशी जोडले गेले, उद्योगांची कार्यसंस्कृती, व्यवस्थापन निर्णय प्रक्रिया, उत्पादन व विपणन धोरणे यांची समज अधिक दृढ झाली. तसेच करिअरच्या दृष्टीने उद्योग अपेक्षा समजून घेण्यास हा दौरा अत्यंत उपयुक्त ठरला.

समन्वयक म्हणून प्रा. डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. स्वप्नील सोनकांबळे व प्रा. पूर्वा साने यांनी काम पाहिले. संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांनी यशस्वी अभ्यास दौरा पूर्ण केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी वेळेत भरला मालमत्ता कर






पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शहरात सुमारे ७ लाख ३२ हजार ३०२ मिळकतींची नोंद असून, त्यापैकी ५ लाख २६ हजार २२६ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तर अद्याप २ लाख ६ हजार ७६ मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली. ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केला नाही त्यांनी चालू वर्षाचा मालमत्ता कर थकबाकी तातडीने भरावा, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत पहिल्या व दुसऱ्या तिमाहीत मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारच्या सवलती देण्यात आल्या होत्या. या सवलतींचा लाभ घेत अनेक नागरिकांनी वेळेत कर भरला असून, यामुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. महापालिकेच्या या नागरिककेंद्रित धोरणाला करदात्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

याशिवाय महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन, रोख, धनादेश तसेच ई-डीसीएस या विविध सुलभ माध्यमांचा लाभ घेत मालमत्ताधारक मोठ्या प्रमाणात कर भरणा करत आहेत. विशेषतः ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून, यामुळे प्रक्रिया अधिक सोपी, जलद आणि पारदर्शक झाली आहे. तसेच अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी तो भरून विलंब दंड तसेच कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत नियमानुसार करण्यात येणारी कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### ऑनलाइन कर भरण्यास पसंती

- मालमत्ता कर ऑनलाइन भरणाऱ्या करदात्यांची संख्या ४ लाख ३० हजार २७९ आहे.
- रोख स्वरूपात ५६ हजार ४५० मालमत्ताधारकांनी कर भरला आहे.
- १२ हजार ५११ जणांनी धनादेशाद्वारे कर भरणा केला आहे.
- बीबीपीएस सुविधेचा लाभ घेऊन २६ हजार ८८१ मालमत्ताधारकांनी कर भरला आहे.
- ई-डीसीएस (EDCS) सुविधेचा लाभ घेऊन १०५ जणांनी मालमत्ता कर भरला आहे.

ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी तातडीने कर भरावा. महापालिकेने कर भरण्यासाठी सुलभ आणि विविध माध्यमे उपलब्ध करून दिली आहेत. वेळेत कर भरल्यास विलंब दंड तसेच जप्ती अथवा इतर कारवाई टाळता येईल. नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात आली आहेत.

**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

पिंपरी-चिंचवड महापालिका सभागृहात कै. दिवंगत आमदार

## लक्ष्मणभाऊ जगताप यांचे तैलचित्र लावण्यात यावे

### नगरसेवक विनोद नढे यांची मागणी



पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात कै. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ पांडुरंग जगताप यांचे तैलचित्र लावण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच महापौर रवी लांडगे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. विनोद नढे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत आणि सर्वांगीण विकासात कै. लक्ष्मणभाऊ जगताप यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. अभ्यासू लोकप्रतिनिधी, कुशल संघटक आणि शहराचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, महापौर, विधान परिषद सदस्य तसेच सलग तीन वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी विविध पदांवर काम करत शहराच्या प्रगतीसाठी आयुष्य वेचले. शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न, रिंग रोडसारखे महत्त्वाचे प्रकल्प तसेच मूलभूत सुविधांच्या उभारणीत त्यांनी पुढाकार घेतल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिकांचे हित जपण्याला त्यांनी प्राधान्य दिले, असेही त्यात म्हटले आहे. महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले जातात.

# पीसीसीओआरला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार हे अभिमानास्पद : ज्ञानेश्वर लांडगे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पीसीसीओईआर ला पुरस्कार जाहीर

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट ही केजी टू पीएचडी शिक्षण देणारी देशातील एक अग्रेसर शैक्षणिक संस्था आहे. पीसीईटीमध्ये आकुर्डी, रावेत आणि साते, वडगाव मावळ अशा तीन भव्य कॅम्पसचा समावेश आहे. यामध्ये शिशुवर्ग पासून डॉक्टरेट होण्यापर्यंत उच्च शिक्षण देणाऱ्या एकूण दहा संस्थांचा समावेश आहे. यामध्ये २०१४ साली रावेत येथे स्थापन केलेल्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रीसर्च (पीसीसीओईआर) या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा "उत्कृष्ट महाविद्यालय (व्यावसायिक कोर्स) पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे हे अभिमानास्पद आहे असे गौरवोद्गार पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी काढले.

पीसीसीओईआर ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा "उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार (व्यावसायिक कोर्स) २०२५-२६" जाहीर झाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी तसे पत्र महाविद्यालयाला दिले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये होणार आहे. रुपये १,५०,०००/-, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

याविषयी अधिक माहिती देताना पीसीसीओईआर चे संचालक, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे कर्मवीर ॲड.बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये २०२५-२६ या वर्षासाठी "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार (व्यावसायिक अभ्यासक्रम) शहरी भाग" साठी पीसीसीओइआर ची निवड झाली आहे. यापूर्वी पीसीसीओइआर ला दोन वेळा 'एनबीए' (नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिशन) मानांकन तसेच आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत एआयसीटीइ, नवी दिल्ली आणि डीटीइ, मुंबई यांच्या द्वारे मान्यता मिळाली आहे. नॅक (३.५४) द्वारे 'ए++' दर्जा मिळाला आहे. पीसीसीओईआर मध्ये ४४ पीएचडी धारक आणि ५५ पीएचडी करणारे प्राध्यापक आहेत. अत्याधुनिक पायाभूत सुविधा, शिक्षण, संशोधन आणि नवीन उपक्रमांसाठी अनुकूल वातावरण असलेल्या पीसीसीओईआरने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पहिल्या पाच महाविद्यालयात स्थान प्राप्त केले आहे.

या महाविद्यालयाने आतापर्यंत ४१९ पेटंट दाखल केले आहेत. ज्यामध्ये २८५ प्रकाशित, ५० मंजूर आणि ३ पेटंट यशस्वीरित्या व्यावसायिकृत सुरू झाले आहेत. १६ फेब्रुवारी २०१८ रोजी, एकाच दिवसात सर्वाधिक कॉपीराईट अर्ज दाखल करून या महाविद्यालयाने 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया' चे प्रमाणपत्र मिळवले आहे. तसेच १७ डिसेंबर २०१९ रोजी, एकाच दिवशी पेटंट दाखल करणाऱ्या पीसीसीओईआरच्या ३८ महिला प्राध्यापकांना देखील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया' ने मान्यता प्रमाणपत्र दिले आहे. उत्पादन विकास, नवीन उपक्रम, प्रकाशन, पेटंट आणि कॉपीराइट फायलिंग, इंक्युबेशन आणि उद्योजकता यावर आधारित प्रकल्प सादर करून उच्चशिक्षित संशोधक घडवणे यावर महाविद्यालय काम करीत असते. यासाठी नेहमीच विश्वस्त मंडळाचा पाठिंबा मिळत असतो. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी पीसीसीओईआर च्या सर्व प्राध्यापक कर्मचारी वर्गाचे हा पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.




## ठेवी परत देण्यासाठी जलद गतीने कार्यवाही करावी

मुंबई (दै. संध्या)

■ सहकार मंत्री बाबासाहेब पाटील
■ आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीमधील गैरव्यवहार

आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीच्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, सहकार विभाग आणि एमपीआयडी विभागाने संयुक्तपणे जलदगतीने कार्यवाही करावी, असे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि. नागपूर (अवसायनात) या पतसंस्थेच्या २५ अपचारी संचालक यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहारसंबंधी विधानसभेत उपस्थित झालेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने या संस्थेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळवून देण्याच्या संदर्भात आढावा सहकार मंत्री पाटील यांनी घेतला. या आढावा बैठकीस सह सचिव तथा अपर निबंधक संतोष पाटील, उपसचिव यमुना कार्ले, नागपूरचे जिल्हा उपनिबंधक कडू यांच्यासह एमपीआयडीचे अधिकारी उपस्थित होते. सहकार मंत्री पाटील म्हणाले, आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि. नागपूर (अवसायनात) या पतसंस्थेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी विनासायास परत मिळाव्यात. यासाठी ज्यांनी हा आर्थिक गैरव्यवहार केला आहे त्यांच्या मालमत्ता जप्त करून नियमानुसार त्यावर कार्यवाही करून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यात याव्यात. या संदर्भात होत असलेल्या कार्यवाहीचा दर महिना आढावा घ्यावा, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.

या पतसंस्थेच्या २५ अपचारी संचालक यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सहा मालमत्ता जप्त करण्यात आल्या असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. उर्वरित मालमत्ता जप्ती प्रकरणी तातडीने कार्यवाही करून ठेवीदारांना दिलासा द्यावा असे, स्पष्ट निर्देश सहकार मंत्री पाटील यांनी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सवलतधारकांसाठी 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड अनिवार्य : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस.टी. महामंडळाने 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून, प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत. यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे. या प्रकल्पासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि NSDL पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे.

या नव्या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे: विद्यार्थी : शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. ज्येष्ठ नागरिक व महिला : अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल. दिव्यांग प्रवासी : UDID क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड. पुरस्कारार्थी व पत्रकार : स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारामार्फत वितरण.

# बंजारा समाजाचे शीख धर्मातील महत्त्व

(दै. संध्या)

■ प्रवीण टाके ■
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
9702858777



भारतीय सामाजिक-आर्थिक इतिहासात बंजारा समाजाचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ययुगीन काळात संपूर्ण भारतभर व्यापार, वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था सांभाळणारा हा समुदाय केवळ आर्थिकच नव्हे, तर धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वाची भूमिका बजावतो. शीख इतिहासातील लखीशाह (लाखा) बंजारा यांचे योगदान हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. श्री गुरु तेगबहादूर साहेब जी यांच्या शहीदीनंतर त्यांची केलेली सेवा, तसेच त्या काळातील बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य, हे दोन्ही घटक शीख-बंजारा संबंधांचे सशक्त द्योतक आहेत.

लखीशाह बंजारा यांचे शीख समाजातील महत्त्व : इ.स. १६७५ मध्ये मुघल सत्तेने श्री गुरु तेगबहादूर साहेबजी यांना दिल्लीत शहीद केले. त्या काळात भयावह वातावरण होते; कोणालाही गुरुजींच्या पार्थिवाला स्पर्श करण्याची हिंमत होत नव्हती. अशा वेळी लखीशाह बंजारा, जे एक नामांकित व्यापारी व कारवाँ प्रमुख होते, त्यांनी एकाच वेळी हजारो बैलगाड्या एकत्रित केल्या. आपल्या जीवाची पर्वा न करता गुरुजींचे पवित्र शरीर आपल्या गाडीत लपवून दिल्लीतील रायसीना परिसरात नेले. एकाच वेळी आलेल्या हजारो बैलगाड्या त्यांनी उडालेला धुराळा यामुळे त्यांच्या मनातील पवित्र कार्य कोणाच्या लक्षात आले नाही. नंतर आपल्या घराला आग लावून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले, जेणेकरून मुघल अधिकाऱ्यांना संशय येऊ नये. आजचे गुरुद्वारा रकाब गंज साहिब हे त्याच बलिदानाची साक्ष देणारे पवित्र स्थळ आहे. या ठिकाणी एक भव्य सभागृह आजही त्यांच्या नावाने उभे आहे. या घटनेमुळे लखीशाह बंजारा हे शीख परंपरेत त्याग, निष्ठा आणि मानवतेचे प्रतीक ठरले आहेत.

श्री गुरु तेगबहादूर साहेबजींच्या कार्यात सहभाग : गुरु तेगबहादूर साहेबजी हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते होते. काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली. लखीशाह बंजारा यांनी केलेली सेवा ही गुरुजींच्या मूल्यांचीच पुनरावृत्ती होती. धर्मापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे, ही शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून दिली.म्हणूनच शीख परंपरेत बंजारा समाजाला "सेवाभावी सहचर" म्हणून सन्मान दिला जातो.

३५० वर्षांपूर्वीचा बंजारा समाजाचे व्यापारी महत्त्व : मुघल काळात बंजारा समाज हा उपखंडातील सर्वात मोठा स्थलांतरित व्यापारी वर्ग मानला जात असे. धान्य, मीठ, कापड, कच्चा माल आणि लष्करी पुरवठा हे मुख्य व्यवसाय. त्या काळातील असुरक्षितता आणि लुटालुट लक्षात घेऊन या समाजाने समुदायातून व्यापार केला.स्वसंरक्षण आणि त्यासाठी आवश्यक शस्त्रकला यामध्ये हा समाज पारंगत होता. भटकंती संदर्भातील रस्ते, जोखीम आणि प्रसंगी लढण्याचे कसब त्यांना अवगत होते. देशाटन करण्याची कला या समुदायाने विकसित केली होती. मोठ्या बैलगाड्यांच्या तांड्यांद्वारे (कारवाँ) हजारो किलोमीटरचा प्रवास केला जात असे.

मुघल लष्कराचा अन्नपुरवठा प्रामुख्याने बंजाऱ्यांकडून होत असल्याची नोंद तत्कालीन प्रशासनिक कागदपत्रांत आढळते. दुष्काळी परिस्थितीतही अन्नधान्याची वाहतूक करून त्यांनी राजकारभार स्थिर ठेवला.

तत्कालीन व्यापार व्यवस्था : बंजारा समाजाची व्यापार व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. प्रत्येक तांड्याला नायक, कारभारी आणि राखणदार असत. मार्ग, पाणवठे, विश्रांतीस्थळे यांची पूर्वनियोजित माहिती त्यांना असे. व्यवहार बहुधा विश्वासावर आधारित, पण ठराविक संकेत आणि मौखिक करारांवर चालत. ही व्यवस्था आजच्या लॉजिस्टिक्स सिस्टीमची आद्य आवृत्ती मानली जाते. त्यांच्या तांड्याची रचना व त्यातून कामाचे वाटप यामुळे अनेक वर्ष हा समुदाय शिस्तबद्ध व्यापारी समुदाय म्हणून सन्मानित केला जातो.या समाजाकडे असणाऱ्या दळणवळण,मनुष्यबळामुळे तत्कालिन राजकीय चौकटीत या समाजाला फार महत्व प्राप्त झाले होते.

हिंदू समाजातील बंजारा समुदायाचे महत्त्व : बहुसंख्य बंजारा समाज हिंदू परंपरेत मोडतो.सण, उत्सव, चालीरीती आणि त्यांचे वार्षिक नियोजन यामुळे या समाजाच्या मान्यतांना विविध समाजात प्रतिष्ठा प्राप्त होती.स्वतःची भाषा, संगीत, खानपान पद्धती,आयुर्वेद व औषध शास्त्राचे उत्तम जाण यामुळे त्यांना अन्य समाजात प्रतिष्ठा होती. त्यांनी देशभरच्या ग्रामीण-शहरी भागांना जोडण्याचे काम केले. स्थानिक बाजारपेठा, मंदिरे, यात्रास्थळे आणि राजकीय केंद्रे यांना आवश्यक वस्तू पुरवून सामाजिक एकात्मता वाढवली. देशभरातील स्वतःच्या समाजातील उत्सव सोबतच अन्य धर्मीयांच्या उत्सवाची माहिती व त्या दृष्टीचे बिनचूक वार्षिक नियोजनामुळे बंजारा समाज हा केवळ व्यापारी नसून, सांस्कृतिक दुवा ठरला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

भाषा, पेहराव आणि अखिल भारतीय सूत्र : बंजारा समाजाची गोरबोली (लामणी/लभाणी) ही भाषा संपूर्ण भारतात वेगवेगळ्या प्रादेशिक प्रभावांसह आढळते. हा एक अखिल भारतीय भाषिक सूत्र आहे. स्त्रियांचा रंगीबेरंगी पोशाख, भरजरी दागिने, पुरुषांचा साधा पण प्रवाससुलभ पेहराव, हे सर्व त्यांच्या स्थलांतरित जीवनशैलीशी सुसंगत होते. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या समाजाने आपले वैशिष्ट्य, भाषा, पेहराव, खानपान यामध्ये एकसूत्री पण ठेवले. कोणत्याही ठिकाणच्या बंजारा समाजाच्या भाषा आणि राहणीमान हे एक दुसऱ्यांसोबत कितीही वर्ष विलग राहिले तरी बदलू न देण्याची हजारो वर्ष परंपरा त्यांनी जपली.अनेक धर्माचे अनेक पंथाचे व चालीरितीचे शासन आले तरी त्यांनी आपली संस्कृती जतन केली.त्यामुळे हा समाज सर्वकालीन समाज व्यवस्थेत देशाच्या कानाकोपऱ्यात आपल्या सन्मानाने आणि लढवय्या बाण्यामुळे तटस्थ आणि वेगळेपण अधोरेखीत करीत गेला.

लाखा बंजारा यांचे व्यापारातील स्थान : लखीशाह बंजारा हे केवळ धार्मिक सेवक नव्हते; ते त्या काळातील यशस्वी व्यापारी होते. दिल्लीसारख्या राजधानीत त्यांचे निवासस्थान आणि व्यापारी जाळे होते. तीन ते चार शतकांचा व्यापाराचा त्यांचा अनेक पिढ्यांचा अनुभव होता. आपल्या मेहनतीने, प्रामाणिकपणाने आणि व्यापार पूरक साहित्य – सुविधांनी त्यांनी गौरवशाली परंपरा निर्माण केली होती. स्वतःचा एक समुदाय, व्यापाराचा वकूब, शब्दाला जपण्याची स्थिरता, धर्माचा स्वाभिमान, व्यवहारातील पारदर्शिता, वक्तशीरपणा आणि लढाऊ वृत्तीमुळे आदर युक्त दहशत या समाजाची तत्कालीन व्यवस्थेत होती. त्यामुळेच गुरुजींच्या पार्थिवाला सुरक्षितपणे हलवणे त्यांना शक्य झाले.

### शीख आणि बंजारा समाजाचा संबंध

लखीशाह बंजारा यांच्या कृतीमुळे शीख-बंजारा संबंध दृढ झाले. पुढील काळात अनेक बंजारा कुटुंबे शीख गुरुद्वारांच्या सेवेत सहभागी झाली. देशभरातील दोन्ही समाजांचा वावर. ठिकठिकाणी व्यापारासाठी व धर्मप्रसारासाठी जाणारे जत्थे व तांडे यातील स्थलांतर हा समान धर्म. विविध वातावरणात अस्तित्व टिकवण्याची परस्पर सांगड. लंगर व्यवस्था, प्रवासातील मदत आणि आपत्कालीन सेवा या क्षेत्रांत दोन्ही समाजातील साम्य या समुदायाला सहजीवनासाठी उपयुक्त ठरला. त्यामुळे देशात या दोन्ही समुदायाने तत्कालीन व्यवस्थेत समान धर्मीय म्हणून मान्यता प्राप्त केले होती. ही व्यवस्था दोन्ही समुदायांच्या संबंधाला काळाच्या कसोटीवर सिद्ध करणारी ठरली आहे.

### श्री गुरु ग्रंथ साहेब ग्रंथामध्ये आदराने उल्लेख

गुरुजींच्या शहादतीमध्ये या समाजाने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचा उल्लेख शिखांच्या पवित्र श्री गुरु ग्रंथ साहेब जी ग्रंथात आहे. तथापि, गुरुमुखी या लिपीमध्ये असलेल्या या पवित्र ग्रंथात थेट "बंजारा" असा उल्लेख क्वचित आढळतो; मात्र सेवा, त्याग, समता आणि मानवता ही मूल्ये बंजारा समाजाच्या जीवनपद्धतीशी सुसंगत आहेत. शीख परंपरेतील सेवाभावात बंजारा समाजाचा आत्मा प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळे शेकडो वर्षांपासून परस्परांच्या मान्यतेत व अस्तित्वात दोन्ही समाजाने एकमेकांचा आदर केला आहे. लखीशाह बंजारा यांचे बलिदान, बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य आणि शीख धर्माशी असलेले नाते हे सर्व भारतीय इतिहासातील सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण आहे. धर्म, जात किंवा व्यवसाय यापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे हीच या परंपरेची खरी देणगी आहे.

## सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक



मुंबई (दै. संध्या)

मौजे नाहुली, सांगवी, चौंडी,आपटी (ता. जामखेड) येथील सहकारी संस्थांचे जिल्हा सहकारी बँकेत खाते उघडणे व सहकार विभागाकडे नोंदणी या संदर्भातील आमदार प्रवीण दरेकर यांच्या लक्षवेधी सूचनेच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात घेण्यात आली. या बैठकीस आमदार प्रवीण दरेकर तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान सहकारी संस्थांच्या नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. येत्या चार दिवसांत सर्व तांत्रिक बाबींचे निराकरण करून या संस्थांची नोंदणी पूर्ण करावी, तसेच संबंधित विभागांनी समन्वय साधून कार्यवाही गतीने पूर्ण करावी, असे सभापती प्रा. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## व्हॅलेंटाइन्स डे स्पेशल! एण्ड टीव्ही कलाकारांचे खास प्लॅन्स

पुणे (दै. संध्या)

■ प्रेमपत्र, लॉन्ग ड्राइव्ह आणि कँडललाइट डेट



फेब्रुवारी महिना म्हणजे प्रेम, रोमांस आणि खास आठवणींचा महिना. व्हॅलेंटाइन्स डे जवळ आला की सर्वत्र प्रेमाची उधळण पाहायला मिळते. छोट्या सरप्राइजपासून ते भव्य सेलिब्रेशनपर्यंत प्रत्येक जण आपल्या खास व्यक्तीसाठी काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करत असतो. एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनीही यंदाच्या व्हॅलेंटाइन्स डे निमित्त आपल्या खास योजना शेअर केल्या आहेत.

'हे भगवान - कितना बदल गया इंसान' या आगामी मालिकेत महादेवाची भूमिका साकारणारा तरुण खन्ना सध्या शूटिंगमध्ये व्यस्त असला तरी या खास दिवसासाठी वेळ काढणार आहे. "व्यस्त वेळापत्रकातही प्रेम व्यक्त करणं महत्त्वाचं असतं. यंदा पत्नीला तिच्या आवडीचं जेवण, मधुर संगीत, मरीन लाइन्सवर लॉन्ग ड्राइव्ह आणि मनापासून लिहिलेलं प्रेमपत्र देऊन सरप्राइज देणार आहे," असं तो सांगतो. 'घरवाली पेडवाली'मधील रमेश म्हणजेच हर्ष वशिष्ठ याच्यासाठी व्हॅलेंटाइन्स डे म्हणजे भावनांना शब्द देण्याचा दिवस. "मोठी गिफ्ट्स महत्त्वाची नाहीत; एकमेकांसाठी वेळ काढणं महत्त्वाचं आहे. यंदा पत्नी रितूसाठी खास प्रेमपत्र आणि डिनर डेटची योजना आखली आहे," असं तो सांगतो.

'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंग म्हणजे योगेश त्रिपाठीही रोमँटिक मूडमध्ये आहे. "खरं गिफ्ट म्हणजे एकत्र घालवलेला वेळ. गेल्या काही वर्षांत जाणवलं की कामापेक्षा नात्यांना वेळ देणं महत्त्वाचं आहे. यंदा कुटुंबासोबत लंच आणि संध्याकाळी खास डेट असणार आहे," अशी माहिती त्याने दिली.

तर 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी म्हणजेच विदिशा श्रीवास्तव यंदा पारंपरिक सेलिब्रेशनऐवजी महाबळेश्वरला जाणार आहे. "आमच्या नात्यात अंतर आणि व्यस्त वेळापत्रकामुळे अनेक चढ-उतार आले, पण त्यामुळे आमचं नातं अधिक मजबूत झालं. शांत वातावरणात वेळ घालवत कँडललाइट डिनरचा आनंद घेणार आहोत," असं ती म्हणाली.

प्रेम, विश्वास आणि एकमेकांसाठी वेळ काढणं हीच खरी नात्यांची ताकद असल्याचं या कलाकारांनी सांगितलं.

दरम्यान, 'हे भगवान - कितना बदल गया इंसान', 'हप्पू की उलटन पलटन' (रात्री ९.३०), 'घरवाली पेडवाली' (रात्री १०) आणि 'भाबीजी घर पर है २.०' (रात्री १०.३०) या मालिका सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर प्रेक्षकांच्या भेटीला येतात. सर्व भाग हिंदी झी5 वरही पाहता येणार आहेत.

# पोटाच्या तक्रारी आता किरकोळ राहिलेल्या नाहीत

■ डॉ. हर्षल राजेकर,
गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट,
मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे

(दै. संध्या)

### पीसीएमसीतील कामकाजी कुटुंबांमध्ये पचनविकार का वाढत आहेत?





पीसीएमसी परिसरातील अनेक कामकाजी कुटुंबांमध्ये पोटातील अस्वस्थता आता दैनंदिन जीवनाचा भाग बनत चालली आहे. जेवणानंतर होणारी आम्लपित्ताची जळजळ, वारंवार होणारी गॅसची समस्या, पोट फुगणे, बद्धकोष्ठता, शौचाच्या सवयींमध्ये अनियमितता किंवा सतत जाणवणारा थकवा — या तक्रारींना अनेकदा साधी पोटाची समस्या किंवा ताणतणावाचा परिणाम म्हणून दुर्लक्षित केले जाते. सहज मिळणाऱ्या औषधांनी तात्पुरता आराम मिळाल्यामुळे या तक्रारी गंभीर नाहीत, अशी समजूत होते; परंतु प्रत्यक्षात पचनसंस्थेशी संबंधित आजार झपाट्याने वाढत आहेत आणि अपेक्षेपेक्षा लवकर वयात आढळत आहेत.

आजचे कामकाजी व्यावसायिक दीर्घ कामाचे तास, अनियमित जेवणाची वेळ, फास्ट फूड किंवा तिखट पदार्थांचे वाढते सेवन, वारंवार चहा-कॉफी पिणे, अपुरी पाणीपिण्याची सवय आणि सततचा ताण यामध्ये अडकलेले आहेत. या सवयींमुळे पचनसंस्थेवर सातत्याने ताण येतो. कालांतराने यामुळे गॅस्ट्रायटिस, आम्लपित्त (अ‍ॅसिड रिफ्लक्स), इरिटेबल बाऊल सिंड्रोम, फॅटी लिव्हर, पित्ताशयाचे विकार आणि आतड्यांतील सूज यांसारखे आजार उद्भवू शकतात. सुरुवातीला किरकोळ वाटणारी समस्या दुर्लक्षित केल्यास ती हळूहळू दीर्घकालीन आजाराचे रूप धारण करू शकते.

उपलब्ध आकडेवारीही ही चिंता अधोरेखित करते. शहरी आणि निमशहरी भारतातील सुमारे ३०–४०% प्रौढ व्यक्तींना वारंवार पचनासंबंधी तक्रारी भेडसावत असल्याचे दिसून येते. फॅटी लिव्हरचा त्रास तर प्रत्येक तीन प्रौढांपैकी एकाला आढळतो, आणि त्यामध्ये लठ्ठ नसलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे. पचनविकार हे वारंवार डॉक्टरांकडे जाण्याचे आणि कामावर गैरहजेरीचे एक प्रमुख कारण ठरत आहेत.

या आकडेवारीमागे अनेक वास्तव कथा दडलेल्या आहेत. पीसीएमसी परिसरातील ४२ वर्षीय छोटे उद्योजक राजेश यांना काही महिन्यांपासून आम्लपित्त आणि पोट फुगण्याचा त्रास होत होता. दुकानाच्या कामात व्यस्त असल्यामुळे ते दिवसभर जेवण टाळत आणि रात्री उशिरा जेवत. अँटॅसिड औषधांनी तात्पुरता आराम मिळत होता; परंतु त्रास परत येत होता आणि सतत थकवा जाणवत होता. अखेर सविस्तर तपासणीनंतर त्यांना सुरुवातीच्या टप्प्यातील फॅटी लिव्हर आणि गॅस्ट्रायटिस असल्याचे निदान झाले. वेळेवर उपचार, योग्य आहार मार्गदर्शन आणि जीवनशैलीतील बदल यामुळे त्यांची प्रकृती सुधारली आणि पुढील यकृत हानी टळली.

अशा घटना एक महत्त्वाचा संदेश देतात — पचनसंस्थेच्या तक्रारी या केवळ किरकोळ अस्वस्थता नसून शरीर देत असलेले इशारे आहेत. सतत होणारी आम्लपित्ताची समस्या, पोटदुखी, शौचाच्या सवयींमध्ये बदल, भूक न लागणे, अनपेक्षित वजन घटणे, मळमळ, उलट्या किंवा काळ्या रंगाची शौच या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. वेळेवर निदान केल्यास बहुतांश पचनविकार शस्त्रक्रियेविना नियंत्रित करता येतात. आधुनिक गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीमध्ये अचूक निदान आणि प्रतिबंधात्मक उपचारांवर भर दिला जातो. एंडोस्कोपी, अल्ट्रासाऊंड, रक्ततपासण्या यांसारख्या प्रगत तपासण्यांद्वारे समस्येचे मूळ कारण शोधता येते. उपचारांमध्ये औषधोपचार, आहार सल्ला आणि प्रत्येक रुग्णाच्या दिनचर्येनुसार जीवनशैलीतील बदल यांचा समावेश असतो. सुरुवातीच्या टप्प्यात योग्य पावले उचलल्यास गुंतागुंत टाळता येते आणि दीर्घकालीन आरोग्य सुधारते.

पीसीएमसी–भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये रुग्णांना त्यांच्या आजाराबाबत योग्य माहिती देणे, चुकीच्या सवयी दुरुस्त करणे आणि पचनसंस्थेचा समतोल पुन्हा प्रस्थापित करणे यावर विशेष भर दिला जातो. उद्दिष्ट केवळ लक्षणांवर उपचार करणे नसून, दैनंदिन काम, कुटुंबीय जबाबदाऱ्या आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी सक्षम असे एकूणच चांगले आरोग्य निर्माण करणे आहे.

निरोगी पचनसंस्था ही शरीरातील ऊर्जा आणि तंदुरुस्तीचा पाया आहे. वारंवार होणाऱ्या पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होऊ शकतो आणि जीवनमान घसरू शकते. आपल्या शरीराचे संकेत ओळखा आणि योग्य वेळी वैद्यकीय सल्ला घ्या — हेच आरोग्यदायी भविष्याचे पहिले पाऊल आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शिक्षक संघाच्या वतीने गुरुवार पेठ येथील सेंट हिल्डाज मुलींची हायस्कूल मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींना पॅड. पेन. आणि शालेय साहित्य वाटप शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य निवडणूक समन्वयक वैभव वाघ यांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी वैभव वाघ म्हणाले विद्यार्थ्यांची शिक्षणाची जिद्द कायम ठेवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती उत्साह वाढून त्यांना प्रेरणा मिळते अशा उपक्रमाला शिवसेना सदैव तुमच्या पाठीशी राहणार असल्याचे सांगितले. या उपक्रमाचे आयोजन शिवसेना शिक्षक संघाचे जिल्हाप्रमुख अनिल गडकरी सर आणि शिवसेना कसबा विधानसभा प्रमुख निलेश जगताप यांनी केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे शिवसेना शहर संघटक प्रकाश ढमढेरे. अनिल बटणे. वैद्यकीय पुणे शहर सल्लागार राजेंद्र बडदे. महिला आघाडी सह संपर्कप्रमुख नीता भोसले. विश्वास दिघे. अहमद खान. आदि यावेळी उपस्थित होते.



### उपमहापौर परशुराम वाडेकर ॲक्शन मोडमध्ये; औंध–बोपोडी प्रभागाची पाहणी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी पदभार स्वीकारताच कामाला सुरुवात केली असून ते ॲक्शन मोडमध्ये दिसून आले आहेत. आज पहाटे ६ वाजता त्यांनी औंध–बोपोडी प्रभागात प्रत्यक्ष फील्डवर उतरून नागरिकांच्या विविध समस्या आणि नागरी सुविधांची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात उपमहापौर वाडेकर यांनी बोपोडी आरोग्य कोठी, नाईक चाळ, भीमज्योत नगर, सर्व्हे नं. २६, पठाण चाळ, रेल्वे गेट, गांधी नगर, भोईटे चाळ तसेच मुंबई–पुणे रोडवरील गेट क्रमांक २० या भागांना भेटी दिल्या. यावेळी औंध वार्ड कार्यालयाचे महापालिका सहाय्यक आयुक्त विजय नायकर, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक विजय भोईर, ए.एस.आय. विनायक चोपडे, संतोष शेलार, मुकादम सोनम गायकवाड, सुपरवायझर पुरुषोत्तम कांबळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान ड्रेनेज लाईन, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या, रस्त्यांची दुरवस्था तसेच पथदिवे यासंदर्भातील नागरिकांच्या तक्रारी उपमहापौर वाडेकर यांनी जाणून घेतल्या. या सर्व समस्यांवर तातडीने व प्रभावी कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

### चाकण येथे शनिवारी किल्लेदारांची बैठक

चाकण (दैनिक संध्या) : किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या शिवजयंतीच्या नियोजनासाठी महिला व पुरुष किल्लेदारांची चाकण येथे शनिवारी (दि.१४) संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी दिली. चाकण येथे प्रतिवर्षी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यंदाची शिवजयंती मोठ्या दिमाखात साजरी करण्याचे नियोजन असून, त्या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी शनिवारी सकाळी साडेदहा वाजता प्रतिष्ठानच्या येथील कार्यालयात सर्व किल्लेदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

### शरद मोहोळ खून प्रकरणात पीडित कुटुंबाकडून वकिलांची नियुक्ती


कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : शरद मोहोळ खून प्रकरणात पीडित कुटुंबाकडून वकिलांची नियुक्ती; विशेष सरकारी अभियोक्त्यांसोबत समन्वय पुण्यातील बहुचर्चित शरद मोहोळ खून प्रकरणात पीडितांच्या कुटुंबियांनी न्यायालयीन प्रक्रियेसाठी स्वतंत्र वकिलांची नियुक्ती केली आहे. मूळ फिर्यादी तर्फे ॲड. खेताराम सोलंकी, ॲड. संकेत राव, ॲड. सोहम यादव व ॲड. तेजस सावंत यांची अधिकृतपणे नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढे सदर प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. प्रदीप सिंग राजपूत (DGP) सोलापूर, यांच्यासोबत समन्वय साधत वरील सर्व वकील मूळ तक्रारदार तसेच पीडितांच्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडित पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली जाईल, असे कुटुंबीयांच्या वतीने सांगण्यात आले आहे. प्रकरणाची पार्श्वभूमी शरद मोहोळ यांचा जानेवारी २०२४ मध्ये पुण्यातील कोथरूड परिसरात भरदिवसा गोळीबार करून खून करण्यात आला. या घटनेनंतर पुणे शहरात मोठी खळबळ उडाली होती. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी काही संशयितांना अटक केली असून गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे, वाहनांची हालचाल आणि सीसीटीव्ही फुटेज यांचा आधार घेत तपास पुढे नेण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता राज्य सरकारकडून विशेष सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पुढील सुनावण्यांमध्ये आरोपपत्र, साक्षीपुरावे व तांत्रिक पुरावे यांवर सुनावणी अपेक्षित आहे. पीडितांच्या कुटुंबीयांनी न्यायालयीन प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचा निर्णय घेतला असून त्यांच्या वतीने नियुक्त वकील विशेष सरकारी अभियोक्त्यांसोबत समन्वयाने कार्य करणार आहेत.

### जेजुरीत वीजेचा शॉक लागून अनोळखी व्यक्तीचा जळून मृत्यू

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी शहरातील चिंचेच्या बागे जवळील कडेपठार रोडवर असलेल्या २२ केव्ही जेजुरी फिडर पिलरमध्ये मंगळवार दि. १० रोजी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास दुर्दैवी घटना घडली. एका अज्ञात व्यक्तीने फिडर पिलरचा दरवाजा उघडून आत हात घातल्याने त्याला जोरदार विजेचा शॉक लागला. शॉक इतका तीव्र होता की संबंधित व्यक्तीचा जळून जागीच मृत्यू झाला. (संबंधित व्यक्ती रिकाम्या बाटल्या गोळा करणारा होता अशी माहिती समजते.) घटनेची माहिती परिसरातील नागरिकांच्या लक्षात येताच तात्काळ महावितरण व पोलिसांना कळविण्यात आले. माहिती मिळताच संबंधित यंत्रणा आणि पोलिस कर्मचारी ,जेजुरी नगरपरिषदेची अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षिततेच्या दृष्टीने वीजपुरवठा तात्पुरता बंद करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

## जेजुरी-निवकने जानाईदेवी पालखी सोहळा दिनांक १९ रोजी होणार मार्गस्थ

जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता श्री जानाई देवीची पालखी पदयात्रा सातारा जिल्ह्यातील निवकने येथे जानाई देवीच्या यात्रेसाठी जेजुरी येथून गुरुवार दिनांक 19 रोजी प्रस्थान करणार असल्याचे श्री जानाई भक्त नागू माळी पालखी सोहळा ट्रस्टचे अध्यक्ष नागनाथ झगडे यांनी सांगितले. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवी ही ग्रामस्थांची व हजारो भाविकांचे जागृत श्रद्धास्थान आहे.या देवीचे मूळस्थान सातारा जिल्ह्यातील निवकणे असून दरवर्षी जेजुरीतून देवीचा पदयात्रा पालखी सोहळा नीवकने कडे जात असतो. या सोहळ्यात हजारो जेजुरी कर भाविक सहभागी होत असतात. महाशिवरात्री दिवशी जेजुरी तून पालखी सोहळा जेजुरी गडावर देवभेटीसाठी निघून तीन दिवस जेजुरी येथील मेंडके वाड्यात सोहळ्याचा मुक्काम असणार आहे.

गुरुवार दि १९ रोजी दुपारी तीन वाजता जेजुरीतून या पालखी सोहळ्याला सुरुवात होणार असून शिव खिंडीत परडी पूजन होवून १९ रोजी वाल्हे गावानजीक कामठवाडी ,शुक्रवार दि २० रोजी सालपे, शनिवार दि 21 रोजी वडुथ , रविवार दिनांक २२ श्रीक्षेत्र माहुली, दिनांक 23 रोजी तारळे येथे सोहळ्याचा मुक्काम असणार आहे. मंगळवार दि २४ रोजी सकाळी १० वाजता कावदरा येथे निसर्गपूजन करुन निवकने येथे सोहळा पोहचणार आहे.रात्री भाजी भाकरी नैवद्य होणार आहे.




## परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

चाकण (दै. संध्या)

चाकण येथील स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेज मधील बारावी बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन जोरदार स्वागत करण्यात आले. स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेज या केंद्रात खेड तालुक्यातील ११ शाळांचे एकूण ४९८ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले आहेत. यामध्ये स्व.आ.सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेज चाकण, भामचंद्र विद्यालय भांबोली, सीतामाई पाटोळे ज्युनियर कॉलेज चाकण, श्री.शिवाजी विद्यामंदिर टेक्निकल कॉलेज चाकण, बाबुराव पवार विद्यालय बिरदवडी, नवचैतन्य विद्यालय काळुस, मॉर्डन हायस्कूल भोसे, भागुबाई पिंगळे नवसह्याद्री विद्यालय चाकण, सुभाषचंद्र विद्यालय बहुळ, श्री. शिवाजी विद्यालय शेलपिंपळगाव, प्रियदर्शनी इंग्लिश मिडीयम स्कुल वाकी या शाळांमधील विद्यार्थी परीक्षेसाठी बसले आहेत. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, मुख्याध्यापिका व केंद्र प्रमुख प्रमिला गोरे, प्रिंसिपल माधुरी गोरे आणि सर्व विभाग शिक्षक यांनी एचएचसी बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कॉपी मुक्त वातावरण व शांतता ठेऊन परीक्षा देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. बारावी बोर्ड परीक्षा यशस्वी होण्यासाठी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, नगरसेविका रूपालीताई कांडगे, जयश्रीताई नायकवाडी, साधना गोरे, पुनम शेवकरी, ॲड. प्रकाश गोरे, मंगेश कांडगे, अनिता घोगरे, साहेबराव कड, रणजीत जरे, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, आकाश जाधव, तृप्ती जगनाडे, प्रकाश भुजबळ, विजया तोडकर, विकास धाडगे, धीरज मुटके, रेश्मा मुटके, प्रेम जगताप, सागर बनकर, महेश शेवकरी, अनिल लोहकरे, ॲड. वर्षा शेवकरी, विकास गोरे, विजया जाधव आदींनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना सदिच्छा व शुभेच्छा दिल्या.


## पांचाळ, गायकवाड यांना 'मार्तंड भूषण' पुरस्कार

### जयमल्हार ग्रामीण विकास संस्थेच्या वर्धापनदिनी होणार सन्मान सोहळा

नीरा (दै. संध्या)

जयमल्हार ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या वार्षिक वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'मार्तंड भूषण' पुरस्कार यंदा दिग्दर्शक प्रकाश पांचाळ आणि कार्यशील समाजसेवक शिक्षक सुशील गायकवाड यांना जाहीर करण्यात आला आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी पुरंदर येथील असेंड इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात हा भव्य सोहळा संपन्न होणार आहे. गेल्या अकरा वर्षांपासून संस्थेच्या वतीने राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात येतो. याआधी





विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर, खेळाडू, अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

यंदा मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या दिग्दर्शन व पटकथा लेखनाच्या कौशल्याने ठसा उमटविणारे प्रसिद्ध दिग्दर्शक प्रकाश पांचाळ यांना 'मार्तंड कला रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच निवृत्तीनंतरही शिक्षण क्षेत्रात विज्ञान प्रयोगशीलतेचा ध्यास घेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करून यशाच्या मार्गावर नेणारे कार्यशील शिक्षक सुशील गायकवाड यांना 'मार्तंड शिक्षणरत्न' पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई असतील. प्रसिद्ध उद्योजक राजकुमार धुरगुडे, मराठी मालिका व चित्रपट अभिनेत्री लक्ष्मी कांबळे, परमपूज्य मोहनसिंग राजपूत तसेच दिग्दर्शक-पत्रकार विजयकुमार हरिश्चंद्रे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी पुरंदर असेंड इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून विविध कला गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संचालक सोमनाथ खोमणे यांनी दिली. या सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शुक्रवारी देशभक्त केशवराव जेधे करंडक वक्तृत्व स्पर्धा

पुणे (दै. संध्या)

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी रोजी शुक्रवार पेठेतील शिवाजी मराठा संस्थेच्या सभागृहात ही स्पर्धा होईल. अशी माहिती स्पर्धा संयोजक आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दिपाली आर. पाटील यांनी दिली.

यावेळी डॉ. अमित गोगावले उपस्थित होते. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र जगताप, मानद सचिव अण्णा थोरात, सहसचिव विकास गोगावले, खजिनदार जगदीश जेधे उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला ११,१११, द्वितीय क्रमांकाला ७,७७७, तृतीय क्रमांकाला ५,५५५ आणि उत्तेजनार्थ ५ क्रमांकाना प्रत्येकी १,१११ रोख तसेच स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

सत्ता नव्हे, सेवा केशवराव जेधे यांची राजकीय भूमिका, डिजिटल युगात माणुसकी हरवते आहे?, जेन झी किती भान किती बेभान?, संस्काराची शाळा बंद होत आहे का, प्रदूषण, पर्यावरण आणि आपण, युवा पिढी आणि बदलत्या नातेसंबंधांचे वास्तव हे स्पर्धेचे विषय आहेत.

## प्रत्येक सोमवारी तांत्रिक कर्मचारी घेताहेत विद्युत सुरक्षेची शपथ

पुणे (दै. संध्या)

विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राथमिकता देत 'शून्य विद्युत अपघात' उद्दिष्टांसाठी महावितरणने राज्यातील उपविभाग व शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्याच्या पहिल्या दिवशी कामाची सुरवात विद्युत सुरक्षा शपथेने करण्याचे निर्देश एका परिपत्रकाद्वारे नुकतेच दिले आहे. कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत विद्युत सुरक्षिततेचे महत्त्व रुजवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी शून्य विद्युत अपघात उद्दिष्टाची प्रभावी व सातत्याने अंमलबजावणी करण्याची सूचना केली. त्याप्रमाणे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत उपाययोजना व लोकसहभागातील उपक्रमांना वेग दिला आहे. 'अभियंते व कर्मचाऱ्यांसाठी विद्युत सुरक्षा ही केवळ नियमावली नसून दैनंदिन कामाचा एक भाग आहे. प्रत्येक जीव मौल्यवान असल्याने 'शून्य विद्युत अपघात' हेच महावितरणचे ध्येय आहे. त्यामुळे विद्युत सुरक्षेचे कायम तंतोतंत पालन करावे', असे आवाहन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे. विद्युत सुरक्षेबाबत सजग व सतर्क राहावे यासाठी महावितरणच्या ६६४ उपविभाग व ३२९१ शाखा कार्यालयांमध्ये प्रत्येक सोमवार हा सुरक्षा दिवस ठरविण्यात आला आहे.

## अधिकृत लोगोचे निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आगामी १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक 'अखिल भारतीय पशु पक्षी महा पशुधन एक्स्पो, २०२६ प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात अनावरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ राजेशकुमार वासनिक, डॉ. विष्णू गर्जे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, डॉ प्रवीण पवार सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व विभागाचे इतर अधीकारी उपस्थित होते. श्रीमती कदम म्हणाल्या,




पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे प्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम असणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान घरबसल्या पाहायला मिळणार आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक पशुपालक, तरुण उद्योजक आणि शेतकरी बाधवानी मोठ्या सख्येने या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन श्रीमती कदम यांनी केले. राज्यातील व राज्याबाहेरील जातीवत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या आणि पक्ष्याच्या विविध प्रजातींचे दर्शन घडणार आहे. आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा नियोजन आणि प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स असणार आहेत. पशुधनाचे आरोग्य, लसीकरण आणि वैज्ञानिक संगोपन यावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित केली आहेत, अशी माहिती डॉ. राजेशकुमार वासनिक यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्था, पंचायत समिती आणि सार्वजनिक ठिकाणी बॅनर व पोस्टर्सच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. विविध समाज माध्यमाच्याद्वारे माध्यमातूनही माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहव. तरी, जिल्ह्यातील सर्व पशुपालक बांधवानी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## स्काउट गाइड मेळाव्यात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलचा दैदिप्यमान विजय!

पिंपरी (दै. संध्या)

चिंचवड येथील स्व. शंकरलालजी मुथा स्काउट गाइड नगरी येथे आयोजित दोन दिवसीय जिल्हा स्काउट गाइड मेळाव्यात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड यांनी आपली यशाची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. या मेळाव्यात एकूण ३१ शाळांमधील १,०१८ स्काउट–गाइड विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. पुणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय, जिल्हा परिषद पुणे, श्री फत्तेचंद जैन विद्यालय व सौ. ताराबाई




शंकरलाल मुथा कन्या प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मेळाव्याचे उद्घाटन पुणे भारत स्काउट गाईडचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र मुथा व जिल्हा संघटक दिगंबर करंडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास जिल्हा परिषद पुणेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, सहाय्यक संचालक (क्रीडा) मिलिंद दीक्षित, संस्थेचे सहाय्यक सचिव अनिल कांकरिया आदी मान्यवर उपस्थित होते. शेकोटी कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी व जिल्हा आयुक्त स्काऊट पुणे डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते झाले.

या मेळाव्यात शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथील ३७ स्काउट गाइड विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध उपक्रमांमध्ये उत्तुंग यश संपादन केले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रा, शेकोटी कार्यक्रम, बिनभांड्याचा स्वयंपाक, चित्रकला स्पर्धा, संचलन अशा विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय पारितोषिके मिळवली. विद्यालयाच्या मार्गदर्शक शिक्षिका स्काऊटडर शीतल बोरुडे मॅडम यांना राष्ट्रीय स्तरावरील जंबोरीत सलग दोन वर्षे प्रथम क्रमांक मिळवून दिलेल्या नृत्यदिग्दर्शनाच्या कार्यासाठी विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. मेळाव्यात कवायती, संचलन, जंबोरीतील स्काउट गाइड सत्कार, परिचयपत्र वितरण आदी उपक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाच्या प्राचार्या रेणुका सिंग मर्चंट मॅडम, उपप्राचार्या सुषमा रासकर मॅडम, तसेच सर्व इन्चार्जेस यांनी विजयी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.